# ओव्हरकोट

अनुवादक
सौ. मिनाक्षी कोल्हटकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# ओव्हरकोट

[निकोलाय गोगोल यांच्या मूळ रशियन कथेचा डेव्हीड मागारशॅक यांनी इंग्रजीत अनुवादित केलेल्या " ओव्हरकोट " या कथेचा मराठी अनुवाद]

अनुवादक

**सौ. मीनाक्षी कोल्हटकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

**Price Rs. 27**

प्रथमावृत्ती : जानेवारी, २००१

**प्रकाशक :**
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, तिंसरा मजला
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग
दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन

**मुद्रक :**
व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नी रोड, मुंबई ४०० ००४.

मूल्य : ₹ 27 [illegible]

# निवेदन

## गाजलेला ओव्हरकोट

निकोलाय गोगोल या रशियन लेखकाची अत्यंत गाजलेली दीर्घ कथा " ओव्हरकोट " याशीर्षकाने प्रसिद्ध आहे. ही कथा मूळ रशियन भाषेत लिहिली गेली. पुढे तिचे इंग्रजी भाषेत भाषांतर झाले. या इंग्रजी भाषांतरावरून श्रीमती मीनाक्षी कोल्हटकर यांनी मराठीत तिचे भाषांतर केले. तेच आज साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने प्रसिद्ध होत आहे.

गोगोल हा गेल्या शतकातला रशियन लेखक १९ व्या शतकातला रशिया हा झारशाहीच्या जुलमी आणि बेबंद कारभारासाठी भरडला जात होता. सत्ताधीश अधिकारी विलासी जीवन भोगत होते आणि सामान्य गरीब जनता असह्य हाल भोगीत होती. " तळमळे अवघी प्रजा, उत्सवी मग्न राजा " या नाट्यगीताची कुणालाही आठवण व्हावी, असेच त्या काळातील रशियन जीवन होते. एका गरीब, सामान्य कारकुनाला थंडीच्या दिवसात नवा ओव्हरकोट निरुपायाने शिवून घ्यावा लागतो. त्यासाठी त्याला कितीतरी दिवस पैशाची बचत करावी लागते. वाटेत चोर त्याचा हा नवा ओव्हरकोट पळवतात आणि त्याला बडवतात. कुठलाही अधिकारी त्याची साधी दाद घेत नाही आणि त्या अवस्थेतच हा बिचारा कारकून मृत्युमुखी पडतो अशी ही करूण कथा आहे. कथेतील कारुण्य मुळातील घटनेत आहेत, पण लेखकाने ज्या उपहासगर्भ शैलीने ही कथा सांगितली आहे, त्या शैलीमुळे वाचकांना त्या काळातील कठोर वस्तुस्थितीचे विदारक दर्शन घडते आणि त्याच्या अंतःकरणाला पीळ पडल्याशिवाय रहात नाही.

वास्तवतेच्या या भेदक दर्शनाने ही कथा अत्यंत गाजली. डोस्टोव्हस्की, चेकॉव्ह, तुर्गेनेव्ह, टॉलस्टॉय अशा अनेक नामवंत लेखकांना गोगोलच्या या कथेतून

वास्तववादी लेखन करण्याची प्रेरणा मिळाली. " आम्ही सर्व लेखक गोगोलच्या या " ओव्हरकोट " मधूनच बाहेर आलो आहोत.--" असे प्रशंसेचे आणि कृतज्ञतेचे उद्‌गार डोस्टोव्हस्कीने पुढे काढले. यावरून या कथेचे मोठेपण वाचकांच्या ध्यानात येण्यास हरकत नांही.

अशा या गाजलेल्या दीर्घ कथेचे मराठी भाषांतर श्रीमती मीनाक्षी कोल्हटकर यांनी करून मराठी वाचकांना या कथेचा आस्वाद घेण्याचा आनंद मिळवून दिला, आज दुर्दैवाने लेखिका हयात नाही, पण त्यानी केलेल्या या कार्याबद्दल मंडळ कृतज्ञ आहे.

**द. मा. मिरासदार**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

# ओव्हरकोट

मूळ लेखक–**निकोलाय गोगोल** मराठी अनुवाद–**मीनाक्षी कोल्हटकर**

## थोडेसे प्रास्ताविक

निकोलाय गोगोल यांचा जन्म १८०९ मध्ये झाला. रशियाच्या ' युक्रेन ' या प्रांतात त्यांचा जन्म झाला. प्रसिद्ध रशियन साहित्यिक ' पुष्कीन ' यांचे ते समकालीन होते.

१४ डिसेंबर १८२५ ला झारशाहीच्या जुलमी राजवटीविरुद्ध उठाव झाला; तो अत्यंत क्रूर दडपशाहीने चिरडण्यात आला. या विशिष्ट कालखंडातील तत्कालीन समाजामध्ये जो अंतर्विरोध होता त्याचं प्रतिबिंब पुष्कीनच्या वाङ्‌मयात हळुवारपणे रेखाटलं गेलं आहे. पण गोगोल यांच्या वाङ्‌मयात हाच अंतर्विरोध वास्तववादी पण उपहासगर्भ शैलीत मांडण्यात आला आहे. त्या काळच्या रशियन साहित्यात हा उपहासात्मक आविष्कार प्रथमच आला होता. हेच गोगोल यांचे खास वैशिष्ट्य आहे.

प्रस्तुत ' ओव्हरकोट ' या कथेतील दुबळा नायक व सत्तामदांध नोकरशहा यांच्यामधील संघर्षाचा शेवट असा भयानक होतो की त्यामुळे वाचकांच्या मनात साहजिक चीड निर्माण होते. यातून गोगोलचा मानवतावादी दृष्टीकोन व अन्यायाविरुद्धची चीड या दोन्ही भावना किती प्रखर होत्या हे सिद्ध होतं.

पुष्कीनना गोगोलबद्दल अत्यंत आदर वाटत होता." गोगोल यांचे रशियन साहित्यातील स्थान अढळ आहे. आमच्या देशाचे ते मानबिंदू आहेत. " असे तुर्गेनेव्ह यांनी गोगोलबद्दल उद्‌गार काढले आहेत.

' ओव्हरकोट ' या गोगोल यांच्या कथेचा प्रभाव त्या काळाच्या सर्व रशियन साहित्यावर जबरदस्त झालेला दिसतो. " आम्ही सर्व गोगोलच्या ओव्हरकोटातून

बाहेर आलो आहोत.'' असे गौरवोद्गार प्रसिद्ध साहित्यिक डोस्टोव्हस्की यांनी अभिमानाने काढले आहेत. गोगोल यांनी त्याकाळच्या रशियन वाङ्मयावर जी छाप बसविली होती; हे उद्गाार त्याचेच प्रतीक आहे.

गोगोल यांचा वारसा त्यानंतर डोस्टोव्हस्की, तुर्गेनेव्ह, चेकॉव्ह, टॉलस्टॉय इत्यादी लेखकांनी चालवला. त्या सर्वांचं लिखाण वास्तववादी व प्रगतीपथावर होतं असं म्हणणं वावगं होणार नाही.

## प्रकरण पहिले

एकदा एका खात्यात; अरे हो! पण नेमक्या कुठल्या खात्यात ते सांगणं जरा कठीणच! अनेक कचेऱ्या, लहानमोठ्या संस्था, त्यातली निरनिराळी खाती; सरकारी कचेऱ्या, मंत्र्यांची खाती, सैन्याच्या म्हणजे संरक्षण खात्याच्या कचेऱ्या, त्यातली अनेकविध खाती, किती म्हणून सांगायचं हो! पण या खात्यांच्या बाबतीत जरा जपूनच बोलावं हे बरं. त्या असंख्य कचेऱ्यांच्या खात्यांतून काम करणाऱ्या एखाद्या व्यक्तीचा अपमान झाला तर तो त्या सबंध खात्याचा अपमान असं मानायची एक प्रथा पडली आहे. गंमत पहा, एका पोलीस महाअधीक्षकानं (कुठल्या शहराचा तो अधीक्षक बरं? त्या शहराचं नाव नाही आठवत) सरकारकडे एक अर्ज पाठविला. त्यानं त्यात लिहिलं '' की, सारे नियम म्हणे डावलले गेले अन् त्याचं नाव त्यात गोवलंय. '' आता ते सिद्ध करण्यासाठी त्यानं भला मोठा अर्ज–ग्रंथच-म्हणाना, सरकारकडे पाठवला. त्या अर्जाच्या लिखाणात प्रत्येक पानावर आपल्या नावाचा उल्लेख येईल अशा तऱ्हेने तो तयार केला. सांगायचा मुद्दा असा की, उगाच गैरसमज वाढायला नको. आपण एक ' क्ष ' खातं असा उल्लेख करू. सोयीसाठी मुलकी खातं म्हणू या.

अशा त्या मुलकी खात्यात एक कारकून काम करत होता. हा मुलकी खात्यातला कारकून काही हुषार किंवा कर्तृत्त्ववान नव्हताच. दिसण्यात सुमारच. काळासावळा, ठेंगू, तोंडावर देवीचे व्रण, डोक्यावर पिंगट केस, त्यातही मधोमध टक्कल, दोन्ही गालफडं आत गेलेली अशी ही दिव्य मूर्ती होती. त्याच्या शरीरसौष्ठवाबद्दल तो काय करणार आणि आपण तरी काय करणार? याला कारण म्हणे त्या सेंट पीटर्सबर्ग शहराच्या हवेचा परिणाम! असेलही. हा आमचा कारकून! (कुठल्या श्रेणीत काम करत होता हे सांगणं कठीण). आमची एकंदर व्यवस्था चौदा श्रेणींत

विभागली आहे. हा कारकून नवव्या श्रेणीत काम करत होता असं वाटतं आणि बरं का, ही नववी श्रेणी एकंदर थट्टेचा विषय आहे. बरेचसे लेखक आपल्या लिखाणातून या नवव्या श्रेणीत काम करणाऱ्या लोकांची टर उडवतात, अगदीच उपेक्षेनं लिहितात. बिचारे या श्रेणीत काम करणारे लोक! त्यांना असल्या लिखाणाला उत्तर द्यायचं जमत नाही हो.

आमच्या या कारकुनाचं नाव होतं बाशमाचकीन. रशियन भाषेत ' बाशमाच्क ' म्हणजे पायातला बूट! या नावाची म्हणजे बाशमाच्क् या शब्दाची व्युत्पत्ती कधी झाली असेल हा संशोधनाचा विषय तो सोडून देऊ. आमच्या या नायकाचे म्हणजे कारकुनाचे वडील, आजोबा, चुलते, भाऊ व इतर कुटुंबातील नातेवाईक नेहमी बूट वापरत असतील व त्या बुटांच्या टाचा वर्षातून कमीत कमी दोन-तीनदा तरी परत बनवून घेत असतील. यामुळे कदाचित हे बाशमाच्कीन नाव त्यांच्या कुटुंबाला चिकटलं असेल. श्रीयुत बाशमाच्कीनचं विशेष नाव होतं अकाकी अकायेविचं. ऐकणाराला हे नाव जरा विचित्र वाटेल पण खरोखरच हेच नाव होतं. ज्या परिस्थितीत हे नाव ठेवलं गेलं त्याला त्यावेळी काही पर्याय नव्हता.

आमच्या स्मरणशक्तीप्रमाणे अकाकीचा जन्म २२ मार्च रोजी रात्री झाला (हो; पण साल कोणते, ते आठवत नाही). अकाकीचे वडिलही कारकूनच होते. अकाकीची आई मात्र फार हुषार बाई होती. तिनंच नाव ठेवायच्या समारंभाची तयारी केली होती. ती स्वतः दरवाजाकडे तोंड करून पलंगावर झोपली होती. तिच्या उजव्या बाजूला गॉड फादर म्हणून इव्हान इव्हानोविच टेवोस्किन उभे होते. फार भले गृहस्थ! सर्वोच्च मंडळात ते अव्वल कारकून म्हणून काम करत होते. अरीना सेम्योनोवेना योवोलोयीब्रुकीना असे नाव आहे. ही जिल्हा पोलीस अधिकाऱ्याची पत्नी. याही तशा सुस्वभावीच. त्या गॉड मदर झाल्या होत्या. इतर मंडळीही होती. या मंडळींनी अकाकीच्या आईला ' मोक्केय ', सोस्सी ' किंवा शहीद झालेला.' ' कोझडाझट ' अशी तीन नावं सुचवली. '' अंहं ! ही काही चांगली नावं नाहीत '' असं अकाकीच्या आईनं नापसंती दर्शवित म्हटलं. यादी चाळून आणखी तीन नाव ट्रिफील, दुला आणि व्हाराखासी अशी सुचवली. वारादत किंवा वारुख एकवेळ ठीक पडेल पण ट्रिफीली, व्हाराखासी ही असली नावं मी कधीच

ऐकली नाहीत. परत त्या लोकांनी पावसीकाखी आणि वाक्टीसी अशीही नावं सुचवली, पण म्हातारीनं तीही नाकारली. शेवटी ती स्वतःच म्हणाली सारा नशिबाचा खेळ! मला वाटतं याला याच्या बापाचंच नाव देऊ या. त्याच्या बापाचं नाव अकाकी होतं. आता हाही अकाकीच होऊ द्या. यानंतर नाव ठेवण्याचा समारंभ झाला. त्यावेळी या मुलानं अशी काही वेडीवाकडी तोंडं केली की; आपणही मोठेपणी बापाप्रमाणे कारकूनच होणार हे जणू काही त्यावेळी त्याला उमजलं असावं.

आम्ही हे सारं थोडं विषयांतर केलं, येवढं विस्तारानं वर्णन केलं, कारण असं की त्या मुलाला त्या परिस्थितीत दुसरं नाव देणं शक्य नव्हतं. नोकरीत अकाकी केव्हा दाखल झाला; त्याची नेमणूक कोणी, कशी व कधी केली हे काही आमच्या स्मरणात नाही. एवढं खरं, की अकाकीनं त्या खात्यात अनेक वर्षं नोकरी केली. अनेक सहकारी, अनेक वरिष्ठ अधिकारी आले, गेले. पण अकाकी मात्र त्याच एका जागी त्याच कामावर – सरकारी कागद पत्रांच्या नकला बनवण्याचं तेचतेच काम करत राहिला. त्यामुळे अकाकी सरकारी नोकराच्या गणवेषात डोक्यावर टक्कल घेऊन त्याच स्थितीत जन्माला आला असावा असा लोकांचा समज झाला होता. खात्यात त्याला जराही मान नव्हता. हाताखालचे कारकून, पट्टेवाले शिपाई त्याला कधी साधं अभिवादनही करत नसत. इतकंच नव्हे तर त्याच्याकडे दुर्लक्ष करत. एकादी माशी इकडून तिकडे उडावी एवढ्या तुच्छतेनं बघत असत. वरिष्ठ तर काय अरेरावी करण्याचं काम करत पण दुय्यम कारकूनसुद्धा वाटेल तेव्हा एखादा कागद अकाकीपुढे सरकवत असे व त्याची नक्कल ताबडतोब हवी म्हणून बिनदिक्कत गुरकावीत असे. बिचारा अकाकी निमूटपणे ते करत असे. कागद कोणी, कधी ठेवला, का ठेवला, ठेवणाऱ्याला आपल्याला हुकूम करायचा अधिकार आहे का; याची साधी चौकशी करण्याचा विचार न करता आपलं नकला करण्याचं काम करत असे. इतर तरुण कारकून त्याची टिंगल उडवत. त्याच्याबद्दल काहीबाही गोष्टी त्याच्यासमोर बसून त्याला ऐकवून चिडवत असत. अकाकीची घरमालकीण सत्तर वर्षांची म्हातारी होती. ती म्हणे अकाकीला कधीकधी झोडपते असंही बोलून टर उडवत. कागदाचे बारीक तुकडे करून ते त्याच्या डोक्यावर टाकून हिमवृष्टी झाली म्हणून टाळ्या पिटत. खात्यातले लोक अशा तऱ्हेने त्रास

देत; पण अकाकी कधीही तक्रार करत नसे, प्रतिकार तर राहोच. त्याचे काम निमूटपणे चालत असे. विशेष म्हणजे त्याच्या कामात कधी चूक होत नसे. कधी कोणी फारच लगट करू लागले तर अकाकी वैतागून म्हणे, '' मित्रांनो मला का त्रास देता; मला माझं काम करू द्या. '' पण एवढं बोलणं सुद्धा न चिडता तो बोले. उलट त्याच्या आवाजात कमालीची अजीजी असे. त्यामुळे ऐकणाराला कींव येई. त्या खात्यात नवीनच रुजू झालेल्या एका तरुण कारकुनाला अकाकीचे वरील प्रकारचे केविलवाणे शब्द ऐकून फार वाईट वाटलं. तेव्हापासून इतरांबरोबर अकाकींची थट्टा उडविण्यात भाग घ्यायचं त्यानं बंद केलं. अकाकीचे ते करूण उद्‌गार ऐकले की त्याला वाईट वाटे व चीड येई. स्वतःला सुशिक्षित म्हणविणारी ही माणसं अशी अमानुषपणे कशी वागतात याचं त्याला आश्चर्य वाटे.

आपलं काम प्रामाणिकपणे करणारे लोक विरळाच! अकाकी त्यातलाच एक होता. तो जीव तोडून काम करत असे. काम करण्यावर त्याचं मनापासून खरंखुरं प्रेम होतं असं म्हटलं तर वावगं होणार नाही. काम करण्यात जणू त्याला सारं विश्वदर्शन होत असे. त्यातच त्याचा परमोच्च आनंद सामावलेला होता. आणि तो त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असे. काही अक्षरांवर त्याचा जीव जडलेला होता. ती विशिष्ट अक्षरं कागदावर उतरवताना तो अगदी खूष असायचा. अशा वेळी तो चुटक्या वाजवी; तोंडानं शीळ वाजवी. जणू काही ती अक्षरं त्याच्या चेहऱ्यावर कोरलेलीच आहेत असा भास होई. पण त्याच्या कामाचं कधी कौतुक झालंच नाही. कौतुक झालं असतं तर त्याची वरच्या जागेवर बढती झाली असती. एवढं परिश्रमपूर्वक काम करून त्याला कधी एखादं बक्षीस मिळालेलंही ऐकीवात नाही. त्याच्याकडे कधीच कोणी लक्ष दिलं नसेल असं म्हणता येणार नाही.

एकदा एका वरिष्ठाचे लक्ष अकाकीकडे गेलं. हे सद्‌गृहस्थ सुस्वभावी व सुशिक्षित होते. अकाकीला नुसतं नकला बनवायचं काम दिलं जातं हे त्यांना बरोबर वाटलं नाही. दुसऱ्या एका खात्यातील केसचा निकाल झाला होता, त्याचा अहवाल अकाकीला तयार करायला सांगितला. त्या अहवालाचं शीर्षक बदलायचं आणि त्यातली क्रियापदं प्रथमपुरुषी होती. ती तृतीयपुरुषी एकवचनी करायची एवढचं काम होतं. तसं ते काम खरोखर जिकीरीचं नव्हतं. अकाकीनं ते काम करण्याची खूप धडपड केली. त्याच्या सर्वांगाला घाम फुटला व तो डोक्यावरून हात फिरवित बसला. त्याला ते काम काही केल्या जमेना. अखेरीस कंटाळून त्याने हार मानली.

" मला हे काम जमत नाही, मला तुम्ही माझं नकला करायचं कामच द्या " असं वरिष्ठांना विनवून सांगितलं. त्याची विनंती मान्य झाली व नकला बनवायचं काम कायमचं त्याच्याकडे देण्यात आलं. नकला बनविण्याशिवाय जगात दुसरं काही काम असतं; याची अकाकीला जाणीवच नव्हती. आपल्या वेषभूषेकडेही लक्ष देण्याची जाणीव त्याला नव्हती. त्याच्या गणवेषाचा मूळचा हिरवा रंग कधीच उडून गेला होता व त्याऐवजी तो गणवेष मळकट पांढुरक्या रंगाचा दिसत होता. त्याच्या कोटाची कॉलर अरुंद व फिट्ट झाली होती. त्यामुळे त्याची मान परदेशी फेरीवाले आणीत असलेल्या शाडूच्या मातीच्या हलणाऱ्या लांब मानेच्या कुत्र्या-मांजराच्या खेळण्याप्रमाणे लांबचलांब दिसत असे. त्याच्या गणवेषावर सदैव एखादी गवताची काडी किंवा रंगीत धागा चिकटलेला दिसायचा. अकाकी रस्त्याने कडेकडेने चालायचा त्यामुळे बाजूच्या घरांच्या खिडक्यांतून फेकलेला कचरा त्याच्या टोपीवर पडत असे. .रस्त्याने चालताना आजुबाजूला काय चाललंय याकडे अकाकीचं बिलकूल लक्ष नसे. या उलट त्याच्या कचेरीतल्या लोकांच्या चौकस नजरेला रस्त्याच्या दुसऱ्या बाजूवरील माणसाच्या कपड्यातली बारीकशी खोडही दिसत असे. चुकून एखादे वेळी अकाकीचं लक्ष एखाद्या दृष्याकडे गेलंच, तर त्याला त्या ठिकाणी नकला बनविण्याच्या कागदांवरील रेषाच दिसत. एकाद्या वेळी समोरून येणाऱ्या गाडीच्या घोड्यानं आपली मान अकाकीच्या खांद्यावर टाकून जोरांत श्वास सोडला म्हणजेच आपण नकला करत कचेरीत नसून रस्त्यावर आहोत याची त्याला जाण येई.

□ □

## प्रकरण दुसरे

कचेरीतून परत आल्यावर अकाकी आपल्या जेवणाचं काम–हो त्याच्या दृष्टीने ते एक कामच होतं–उरकून टाकत असे. जेवण म्हणजे काय कोबीचा रस्सा, थोडं बीफ, गाईचं मांस व त्याच्याबरोबर पाव! बस्स येवढंच. त्या पदार्थांची चव कशी आहे याची त्यानं कधी फिकीर केली नाही. पोट भरलं की जेवण संपवायचं येवढं त्याला माहीत होतं. जेवण झाल्यावर लगेच तो आपलं लेखन साहित्य बाहेर काढी मग कचेरीतून आणलेल्या दस्तऐवजांच्या व अहवालांच्या नकला बनवायला बसे. नवीन नकला बनवायचं काम नसलंच तर तो केलेल्या नकलेची पुन्हा नक्कल करायला बसत असे. त्यात त्याला आनंद वाटत असे. एखादा अहवाल एकाद्या मोठ्या व्यक्तीकडून आलेला असला तर त्याची नक्कल करून ती आपल्या संग्रही ठेवण्याची त्याला मोठी आवड होती.

दिवस मावळत आला की सेंट पीटर्सबर्ग शहरातले लोक; विशेष करून सरकारी नोकर आपापल्या घरी जेवणाचा कार्यक्रम आपापल्या आवडीप्रमाणे व ऐपतीप्रमाणे उरकत असे. दिवसभर कचेरीत खर्डेघाशी केल्यावर, तसेच संसारातल्या लहानमोठ्या कटकटींची निरवानिरव केल्यावर आलेला शीण विसरण्यासाठी थोडी विश्रांती किंवा काही करमणूक करून घेण्याची आवश्यकता सर्वांनाच वाटत असे. प्रत्येकजण ती स्वतंत्रपणे आपल्या आवडीप्रमाणे व आपल्याला परवडेल अशा तऱ्हेने निवड करीत असे. कोणी नाटकाला जात. कोणी बाजारात फेरफटका मारायला जात. कोणी शेजाऱ्याकडे पत्ते खेळायला जात; कोणी एकाद्या पार्टीला जाई तर कोणी इतरांना जमवून बड्या लोकांच्या कुलंगड्यासंबंधी रसभरीत चर्चा करत. अशा तऱ्हेने सरकारी नोकर लोक करमणूक करून घेण्यात समाधान मिळवत असत. पण एकटा अकाकी अकायेवीच मात्र अशा तऱ्हेने करमणूक करून घेण्याच्या फंदात पडत नसे. त्याला कधी पार्टीला वगैरे जाताना कोणी पाहिलं

नव्हतं. नकला बनवण्याचं काम मन:पूर्वक करून झाल्यावर अकाकी समाधानानं आपल्या बिछान्यावर आडवा होई. पण त्याही वेळी दुसऱ्या दिवशी आपल्याला नकला बनवायला काय मिळेल याचा मनाशी विचार करत तो झोपी जात असे. अकाकीचं आयुष्य अशा तऱ्हेने संथ प्रवाहासारखं चाललं होतं. त्याला वर्षाकाठी मिळणाऱ्या चारशे रुबल पगारात तो समाधानी होता. म्हातारपणापर्यंत असंच आयुष्य चाललंही असतं. अचानक कधी अडचणी उद्भवतात व आयुष्याला कलाटणी मिळते. तशा अडचणी काय श्रीमंत; गरीब साऱ्यांनाच येतात. इतकंच काय, कधीही कुणाच्याही अध्यात मध्यात न येणाऱ्या लोकांवरही काही एक अपराध नसताना अडचणी उद्भवतात.

सेंट पीटर्सबर्ग शहरातल्या लोकांचा एक मोठा शत्रू आहे. तुमचा तर्क निराळा असेल पण हा शत्रू म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून तिथल्या हिवाळ्यात उत्तरेकडून येणारा भयानक हिमवर्षाव. तिथले लोक म्हणतात, ते प्रकृतीला चांगलं असतं. सरकारी नोकरांच्या कामावर जायच्या बरोबर वेळेला, साधारण सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास ही झोडपणी सुरू होई. लोकांच्या तोंडावर प्रचंड मारा होत असे. त्या वर्षावातून श्रीमंत, गरीब कोणीही सुटत नसत. पण बिचारे सामान्य, चारशे रुबल वर्षाकाठी मिळवणारे सरकारी नोकर आपले जुनेपुराणे ओव्हरकोट चढवून धावत पळत कचेरीला जात. कचेरीच्या इमारतीच्या देवडीवर आपले पाय आपटून गारठलेल्या आपल्या शरीरात ऊब आणण्याचा प्रयत्न करत. अंगात ऊब आली की मग कामाला हात घालत.

घरापासून ते कचेरीपर्यंत अंतर कितीही धावपळ करून संपविण्याचा प्रयत्न केला तरी ती थंडी आपल्या पाठीवर, खांद्यावर घुसत आहे असं अकाकीला वाटत असे. आपल्या या गरम कोटाचाच काहीतरी दोष असला पाहिजे. असं त्याला वाटे. तो कोट पाठीवर व पायावर साफ विरला होता. तो कोट घरगुती पिंजलेल्या कापसासारखा दिसत असे. त्याचं अस्तर पार फाटत आलं होतं व जागजागी त्याला भोकं पडली होती. त्यातूनच थंडी घुसत असे. अकाकीचा तो कोटसुद्धा त्याच्यासारखाच कचेरीत थट्टेचा विषय झाला होता. त्या कोटाचा आकार विचित्रच झाला होता. कोटाच्या कॉलरचे तुकडे इतरत्र ठिगळ लावण्यासाठी कापून काढल्याने ती कॉलर अगदी एवढीशी राहिली होती. ठिगळ लावताना शिंप्याला

काही कौशल्यही दाखवता येत नसे. त्या कोटाला आता कोट म्हणणेही मुश्कील झालं होतं. कारण त्याचा आकार एखाद्या पिशवीसारखा झाला होता. कोट आता शिंप्याकडे नेलाच पाहिजे असं अकाकीला वाटलं. अकाकीच्या घराच्या मागच्या गल्लीतच पेट्रोविच नावाचा शिंपी राहात असे. या पेट्रोविचच्या तोंडावर देवीचे व्रण होते व एक डोळा जवळजवळ गेलेलाच होता. हा शिंपी सरकारी कारकून व गरीब लोकांचे जुने कोट, पाटलोणी, सदरे वगैरे दुरुस्त करून देण्याचं काम करत असे अर्थात् त्याचं डोकं ताळ्यावर असलं व नशेत नसला म्हणजे तो हे काम करत असे.

आपण त्या शिंप्याच्या वर्णनानं फारसा वेळ खर्च करायचा कशाला! पण आजकाल प्रत्येक कथेत येणाऱ्या साऱ्या व्यक्तिरेखा वर्णन केल्या पाहिजेत असा कथा लेखनाचा रिवाज आहे ना! तर असा हा पेट्रोविच. त्या शिंप्याचं विशेष नाव होतं ग्रेगरी व लोक त्याला त्याच नावाने ओळखत. तो कोणा एका सद्गृहस्थाकडे गुलाम म्हणून होता. गुलामीतून सुटका झाल्यावर त्यानं पेट्रोविच हे नाव घेतलं. तो प्रथम मोठ्या सणाच्या दिवशी दारू पीत असे. मग प्रत्येक रविवारी पिऊ लागला. हळूहळू प्रत्येक दिवशी तो दारू पीत असे. अगदी ठोसून दारू पीत असे. या बाबतीत तो आपल्या घराण्याच्या परंपरेला जागत होता. या त्याच्या पिण्याच्या संवयीमुळे त्याचे व त्याच्या बायकोचे सतत खटके उडत. तो तिला जर्मन व व्यवहारी बाई म्हणायचा. त्याच्या बायकोचा उल्लेख आलाच आहे तर दोन शब्द तिच्याबद्दलही लिहूया. आम्हाला त्या बाईबद्दल तशी फारशी माहिती नाही हं! ती पेट्रोविचची बायको, येवढं माहीत आहे. ती दिसायला सुंदर होती की नाही सांगता यायचं नाही. पण गर्व करण्यासारखं सौंदर्य तिच्याजवळ नव्हतं येवढं बरीक खरं. ती डोक्याला रुमाल बांधत नसे. बाहेर जाताना बायकांनी खास वापरायची टोपी असते, ती घालत असे. ती रस्त्यानं जाऊ लागली तर गस्तवाले वाहतूक नियंत्रक शिपाई तिच्याकडे वाकून बघून काहीतरी बाष्कळ बोलत. पेट्रोविचच्या जिन्याच्या पायरीवर सदैव पाणी वाहत असे व साऱ्या पायऱ्या त्यामुळे बुळबुळीत व निसरड्या असत. इतकेच नव्हे तर तिथे एक प्रकारचा नाकाला झोंबणारा दर्प व डोळ्यांना न पहावणारे असे दृष्य नेहमी दिसत असे. पण सेंट पीटर्सबर्गच्या घरांच्या मागच्या बाजूच्या जिन्याचे हे स्वरूप सगळीकडे असंच असे. जिना चढताना ओव्हरकोट

दुरुस्त करायचे किती पैसे पेट्रोविच मागेल याचा अकाकी विचार करत होता. दोन रुबलपेक्षा काही झालं तरी जास्त द्यायचे नाहीत, असं अकाकीनं मनाशी पक्कं ठरवलं होतं. पेट्रोविचच्या घराचा दरवाजा उघडाच होता. त्याची बायको मासे तळत बसली होती. तळण्यामुळे सारी खोली धुरानं भरली होती. आत स्वैर विहार करणारे प्राणी, विशेषतः झुरळ वगैरेंची गैरहजेरी दिसत होती.

धुरातून वाट काढत अंकाकी पेट्रोविच बसला होता त्या खोलीत पोचला. पेट्रोविच एका मोठ्या टेबलाजवळ पाय खाली सोडून एकाद्या तुर्की बादशहाप्रमाणे ऐटीत बसला होता. त्याच्या पायात मोजे नव्हते. त्याचा एक पाय सुजलेला होता. त्या पायाचं नख वेडंवाकडं असून कासवाच्या पाठीसारखं जाड झालं होतं. अकाकीची नजर त्या पायावर गेली. त्या पायावर एक कापडाचा फाटका तुकडा लोंबत होता. रेशमी व सुती धागे पेट्रोविचच्या खांद्यावरून लोंबत होते. पेट्रोविच मोठ्या कष्टानं सुईत धागा ओवण्याचा प्रयत्न करत होता. खोलीत भरलेल्या धुरामुळे पेट्रोविचला दिसत नव्हतं. त्यामुळे धागा सुईत जात नव्हता. पेट्रोविच शेवटी चिडून त्या सुईला व धाग्याला शिव्या देऊ लागला. " अगं बये, कां तू माझा जीव खात आहेस? "

पेट्रोविचला भलत्याच वेळी आपण भेटायला आलो असं अकाकीला वाटलं. पेट्रोविच थोडी ब्रँडी वगैरे झोकून खुशीत असेल तेव्हा त्याच्याशी बोलावं हे अकाकी जाणून होता.पेट्रोविचची बायकोही ते समजून होती. प्यायल्यावर पेट्रोविच रंगात येऊन बोलायचा व पैशांबद्दल फारशी घासाघीस करत नसे; उलटं मिळतील तेवढे पैसे घेऊन धन्यवाद द्यायचा. पण पेट्रोविचची बायको पक्की व्यवहारी. ती रडवेली होऊन अकाकीला म्हणायची " माझा नवरा दारूच्या नशेत म्हणून काहीतरी बोलला. पैसे फारच कमी सांगितले. मग अकाकी दहा कोपेकचं नाणं तिच्या हातावर ठेऊन तिची बोळवण करायचा. पण आज पेट्रोविचचा नूर काही वेगळाच होता. तो प्यायलेला नव्हता पण चिडलेला दिसत होता. अकाकीनं तिथून परतायचा विचार केला. कारण पेट्रोविच या स्थितीत जास्त पैसे मागेल असं अकाकीला वाटलं.

इतक्यात पेट्रोविचनं आपला एकुलता एक डोळा बारीक करून प्रश्नार्थक नजरेनं अकाकीकडे पाहिलं.

'' सलाम पेट्रोविच '' असा अकाकीनं पेट्रोविचच्या प्रश्नार्थक मुद्रेला प्रतिसाद दिला.

'' सलाम साहेब, बोला '' त्याची नजर अकाकीच्या हातातल्या बंडलाकडे गेली.

'' असं पहा पेट्रोविच; माझं ते जुनचं काम; तुला गड्या माहीतच आहे. हेच काम आणलंय. ''

अकाकी नेहमी तर-तमच्या भाषेत बोलायचा, विशेषण क्रिया विशेषण यांचा आपला मुद्दा सांगताना क्वचितच वापर करत असे. वाक्य पुरे बोलायची तो हिंमतच करत नसे. तर वाक्य अर्धवट सोडायचं अशी त्याची सवय होती.

'' साहेब तुमच्या हातात काय आहे? '' असं पेट्रोविचने शेवटी अकाकीला विचारलं व उत्सुकतेने अकाकीच्या उत्तराची वाट पाहू लागला. आपल्या डोळ्यानं अकाकीचा गणवेष–कॉलर, बाह्या, बटन, काज–हे बारकाईनं न्याहाळत राहिला. अकाकीच्या कोटाची सारी रूपं पेट्रोविचच्या चांगलीच परिचयाची होती कारण त्यानंच ती वेळोवेळी दुरुस्त करून दिली होती. एकादं जुनं गिऱ्हाईक आलं की त्याच्याकडे असं निरखून बघण्याचा सगळ्या शिंपी लोकांचा रिवाजच असतो.

'' असं पहा पेट्रोविच, मी आलोय या कामासाठी '' असं म्हणून पुडक्याकडे अकाकीनं पाहिलं. तसा माझा हा कोट बाहेर घालून जाण्यासारखा आहे. कापड अजून चांगलं आहे. कॉलर जरा मळली आहे. मला ठाऊक आहे, मी साफ केली आहे पण तुला ती जुनी झालेली वाटेल. पाठीवर व बाह्यांवर कोटाचं कापड जरा विरलंय, थोडी दुरुस्ती केली की ठीकठाक होईल.

पेट्रोविचनं अकाकींच्या हातातलं पुडकं घेऊन खोललं व आतील वस्तू टेबलावर पसरली. बराच वेळ निरीक्षण करून त्यानं मान हलवली. खिडकीत ठेवलेली तपकिरीची डबी उघडली व त्यातली तपकीर नाकात कोंबली. परत एकदा त्या पसरलेल्या कोटाचं निरीक्षण केलं. कोट उलटा करून पसरला. तपकीर पुन्हा एकदा नाकात कोंबली. त्या तपकिरीच्या डबीवर एका सरसेनानीचं चित्र होतं पण झाकण तुटलेलं असल्यामुळे बिनचेहऱ्याचं ते चित्र होतं. पेट्रोविचनं कोट उलटा सुलटा फिरवून नकारार्थी मान हलवली व त्या कोटात काहीच अर्थ नाही

असं अकाकीला निक्षून सांगितलं. तो कोट दुरुस्त होण्याच्या पलीकडे गेला आहे. अकाकीला एकदम धस्स झालं. काय करावं, बोलावं असा विचार पडला.

" अरे बाबा पेट्रोविच कोट दुरुस्त का होणार नाही? जरा कुठे कुठे विरलाय. तुझ्याकडे ठिगळ लावायला तुकडे असतील पहा " अगदी अजिजीनं अकाकी बोलला.

" अहो साहेब माझ्याकडे चिक्कार तुकडे आहेत. पण ते याच्यावर नाही बसवता येणार, सारा कोट इतका जीर्ण झालाय की जरा सुई लावली तर कापडाचा भुगा पडेल. "

" तुकडे झाले तर तू जोडू शकतील " अकाकी पुन्हा एकदा कळवळून बोलला.

" साहेब माफ करा. तुकडे झाले तर कसे जोडायचे मला कळतं पण कशावर जोडायचे? अहो, हे अस्तर किती जीर्ण झालंय. कपडा असं म्हणणं सुद्धा बरोबर नाही. कपडा नाही, भुगा झालाय भुगा. मोठं वारं आलं तर उडून जाईल."

" जरा बघ काही होतंय का? कृपा कर जरा माझ्यावर ".

नाही साहेब काहीही करता येणार नाही. हा तुमचा कोट पार कामातनं गेलाय. तुम्ही असं करा साहेब येत्या हिवाळ्यात याचे तुकडे करून पायाला ऊब येण्यासाठी पायमोज्याऐवजी ते वापरा. पैसे कमावण्यासाठी जर्मनानी कसले पायमोजे शोधून काढले आहेत; त्याला काही ऊबच राहिली नाही. (जर्मनांच्या विरुद्ध बोलायचं हा पेट्रोविचचा आवडीचा छंद) साहेब तुम्हाला नवा कोटच बनवायला हवा. "

नवा कोट म्हटल्याबरोबर अकाकीला एकदम चक्करच आली. सगळी खोली जणू त्याच्याभोवती फिरू लागली. त्याला फक्त पेट्रोविचच्या तपकिरीच्या डबीवर असलेलं डोकं तुटून गेलेलं सरसेनानीचं चित्रच दिसत होतं.

" नवीन कोट करायला पाहिजे असं म्हणतोस तू ! पण बाबारे माझ्याकडे येवढे पैसे कुठून असणार? " अकाकी अगदी रडकुंडीला आला.

" ते मी कसं सांगू? पण तुम्हाला आता नवाच कोट करायला पाहिजे साहेब. "

हे ऐकूण अकाकी जरा सावरून म्हणाला, " बरं समज, नवा करायला किती खर्च येईल?"

" म्हणजे किती पैसे लागतील असंच ना? "



एन ४५०३-३ (१,११५-१-२००१)

'' होय रे बाबा तेच. ''

'' साधारण साडेतीनशे रुबल्स-अं-थोडे जास्तच. एवढे तरी नक्कीच लागतील''. पेट्रोविचनं ठासून सांगितलं.

दुसऱ्या माणसाला जरा कडक शब्दात सुनवायची पेट्रोविचची ही सवय होती; आणि आपल्या कडक बोलण्याचा काय परिणाम होतो त्याचा खाली मान वळवून अंदाज घ्यायचा.

'' एवढा खर्च एका ओव्हरकोटाला? '' बिचारा अकाकी प्रथमच जरा मोठ्यानं ओरडला. आयुष्यात प्रथमच येव्रढ्या मोठ्यानं आवाज चढवून बोलला. कारण सदैव हळू आवाजात बोलायची त्याची लकब होती.

'' होय साहेब तुम्हाला कसल्या प्रकारचा कोट हवा त्यावर पैसे किती लागतील ते अवलंबून आहे. तुम्हाला कॉलर हवी असली व रेशमी अस्तर हवं असलं तर आणखी दोनशे रुबल लागतील. '' हे पहा पेट्रोविच, अकाकीनं त्याला मध्येच अडवलं. शिंपी काय म्हणतो हे जणू आपण ऐकलंच नाही असं दाखवत अकाकी म्हणाला, '' कृपा करून तू हाच मला जरा दुरुस्त करून दे कसा. मी आणखी काही दिवस हाच वापरीन आपला.''..........

'' नाही ! नाही! नाही!! यात आता दुरुस्ती होणं शक्यच नाही. माझा वेळ फुकट जाईल आणि तुमचे पैसेही. '' पेट्रोविचनं अगदी निर्धारानं शेवटचं सांगून टाकलं.

अकाकीही पेट्रोविचच्या घरून निघाला. पेट्रोविचच्या बोलण्यांमुळे तो पार खचला होता.

शिंपी तसाच आपल्या टेबलाशी उभा होता. विचारात गढून गेला होता. आपण आपली किंमत कमी होऊ दिली तर नाहीच पण गिऱ्हाईकाला चांगला टोला हाणला ह्या विचाराने मनातून खूष झाला होता.

रस्त्यावर आल्यावर आपण स्वप्नात तर नाही ना, असा अकाकीला भास झाला. '' एकंदरीत असं आहे तर! अकाकी स्वतःशीच पुटपुटत होता. हे असं काही होईल असं मला वाटलं नव्हतं. जरा थांबून तो परत बोलू लागला, बरंय ! बरंय!! हे एक आश्चर्य आहे......... अशा तऱ्हेने शेवट होईल अशी मी कधी कल्पनाही केली

नव्हती. असं आहे तर एकंदर! हा केवढा मोठा धक्का बसला मला. सारा गोंधळ झालाय अगदी! ''

अशा तऱ्हेने अकाकी विचार करत मध्येच स्वत:शीच बोलत रस्त्यानं जात होता. त्या नादात तो आपल्या घराच्या विरुद्ध दिशेला गेला. तो एवढा नादात होता की, एक सफाई कामगार अकाकीच्या शेजारून चालत असता त्याच्या झाडूला असलेली काजळी अकाकीच्या कोटाच्या खांद्यावर लागली. एका इमारतीवर गिलावा करण्याचं काम चालू होतं; त्यातला बराचसा गिलावा अकाकीच्या खांद्यावर पडला. तरीही अकाकी अजून आपल्या तंद्रीतून जागा झाला नव्हता. चालता चालता त्याचा धक्का एका वाहतूक नियंत्रक शिपायाला लागला, तेव्हा त्या शिपायानं आपला दंडुका अकाकीवर रोखला. आता कुठे अकाकी भानावर आला. शिपाई बोलला, '' अरे सारा फूटपाथ मोकळा पडलाय, तो तुला पुरत नाही चालायला? कुठं जायचंय तुला? मला धक्का मारतोय. वारे, वा! अकाकी भानावर आला व चटकन मागे वळला.

घरी पोचल्यावर अकाकी आपल्या परिस्थितीबद्दल विचार करू लागला. एखाद्या जिवलग मित्राशी आपल्या सुखदु:खाची खाजगी सल्लामसलत करावी तसा तो स्वत:शीच गंभीरपणे चर्चा करायला बसला.

छे! छे! त्या पेट्रोविचशी बोलण्यात काही अर्थ नाही तो लेकाचा आज जरा........... कदाचित बायकोनं फैलावर घेतलं असेल. आता पुढच्या रविवारी आपण त्याच्याकडे जावं. शनिवारी रात्री तो खूप दारू पिईल. रविवारी सकाळी तो जरा सुस्तीतच असेल. तरीही त्याला सकाळी नवटाक लागेलच. पण बायको पैसे देणार नाहीच. अशावेळी आपण त्याला दहा कोपेक थोडे जास्त लागले तरी देऊ मग तो खूष होऊन सरळ बोलेल आणि आपल्या कोटाबद्दलचं त्याचं मतही बदलेल. माझं सगळंच काम होऊन जाईल........

अशा तऱ्हेने स्वत:च प्रश्न करून स्वत: त्याचं उत्तर मिळवलं त्यात अकाकीला समाधान वाटलं. धीर आला.

□ □

## प्रकरण तिसरे

रविवार एकदाचा उजाडला. पेट्रोविचची बायको काही कामानिमित्त बाहेर गेलेली अकाकीनं पाहिलं. तो त्याच मागावर होता. अकाकी पेट्रोविचच्या घरात जवळजवळ घुसलाच. त्याच्या अटकळीप्रमाणे पेट्रोविच आदल्या दिवशी म्हणजे शनिवारच्या रात्रीच्या मदिरापानाच्या गुंगीत होता. तो बिछान्यात लोळत पडला होता. तशाही स्थितीत अकाकीला आलेला पाहून, त्याच्या येण्याचं काय कारण असेल याचा पेट्रोविचला बरोबर अंदाज आला.

'' साहेब तो ओव्हरकोट दुरुस्त होणार नाही. तुम्हाला नवीनच केला पाहिजे.'' यावर अकाकीनं एक दहा कोपेकचं नाणं पेट्रोविचच्या हातावर ठेवलं. खूष होऊन पेट्रोविचनं '' धन्यवाद, साहेब! मला एक नवटाक मिळाली तर मला ताकद येईल. देव तुमचं भलं करो! असा तोंडभर आशीर्वाद दिला. थोडं थांबून पुन्हा म्हणाला. '' खरं सांगू साहेब, मी तुमच्या जागी असतो तर त्या जुन्या कोटाचा विचार डोक्यातून काढून टाकला असता. कारण तो पार कामातून गेलाय. मी तुम्हाला छानसा नवीन कोट बनवून देईन. अगदी नक्की बनवून देईन.''

तोच जुना कोट जरा दुरुस्त करून दे ना, म्हणून अकाकीनं पेट्रोविचला सांगायचा खूप प्रयत्न केला. पण पेट्रोविच काहीही ऐकून घ्यायला तयार नव्हता. '' छे! छे! ती गोष्टच बोलू नका. मी तुम्हाला छानदार सोनेरी पट्टी लावून कॉलरचा नवा कोटच बनवून देईन. ''

अकाकीनं शेवटी हार खाल्ली. नवा कोट बनवण्यावाचून गत्यंतर नाही या विचारानं तो अवाक् झाला. येवढी रक्कम कुठून आणायची? कशी जमवायची? समजा सुट्टीच्या दिवशी केलेल्या जादा कामाचे पैसे मिळणार आहेत. आणखी काम केलं तर आणखी पैसे मिळतील. पण या पैशांचा विनियोग कसा होणार, ते सारं

आधीच ठरलेलं नाही का? दोन नव्या पाटलोणी व तीन शर्ट आणि चड्ड्या बनवायला दिल्या आहेत. बुटाला सोल घालायला दिलंय; त्याचे पैसे, असे खर्च आहेत व यातच मिळणारे पैसे संपतील. पैशाचं काय? हो! पण समजा की, मोठ्या साहेबानं उदारपणे आपल्याला थोडा बोनस दिला तर! तरीही कोटाच्या किंमतीच्या मानाने अगदीच नगण्य. पेट्रोविचही असा विक्षीप्त असामी आहे. त्याची बायकोसुद्धा असं म्हणते की एकेकदा मनात येईल ती किंमत सांगेल कधी एकादं काम फुकटही करून देईल. अगदी बेभरंवशाचा! मला आता फार जरूर आहे तेव्हा खुशाल वाटेल ती किंमत सांगेल. असे उलटसुलट विचार अकाकीच्या मनात येत होते.

पेट्रोविच ऐंशी रुबलमध्ये आपल्याला कोट बनवून देईल असं अकाकीला वाटलं. पण हे ऐंशी रुबल तरी कुठून आणायचे? मोठ्या मुष्किलीनं अर्धी रक्कम उभी करू असं अकाकीला वाटलं. पण तरीही अर्ध्या रकमेचा प्रश्न शिल्लक राहतोच.

आता अकाकी अर्धी रक्कम कशी उभी करणार ते आपण पाहू. प्रत्येक वेळी एक रुबल मोडला की काही कोपेक एका बंद पेटीत टाकायचे अशी अकाकीची पद्धत होती. त्या बंद पेटीला छोटसं नाणं आत जाण्याइतकं भोक अकाकीनं ठेवलं होतं. सहा महिन्यानी ती पेटी उघडून कोपेकची नाणी काढून त्याच्या किंमती येवढे रुबल त्यात टाकायचे, असं अनेक वर्ष तो करत होता. त्या पेटीत कदाचित एव्हाना चाळीस तरी रुबल साठले असतील. तरीही ते कसे पुरे पडणार? आणखी चाळीस रुबल्सचा प्रश्न राहतोच!

अकाकीनं खूप विचार केला. काहीतरी मार्ग काढलाच पाहिजे. थोडी काटकसर करायची. काटकसर करायची म्हणजे आपल्या रोजच्या खर्चाला कुठे कुठे कात्री लावायची. संध्याकाळी घरी आल्यावर होणारा चहा त्यानं बंद केला. रात्री मेणबत्त्या लावायच्या नाहीत. तसंच महत्त्वाचं काम असलंच तर मालकिणीच्या घरी बसून तिच्या मेणबत्तीच्या उजेडात ते उरकायचं. तसंच रस्त्याने जाताना अगदी जपून चालायचं; म्हणजे खड्डे वगैरे टाळून घालायचं. उद्देश हा की, बूट कमी झिजतील. धोब्याला कपडे कमी धुवायला द्यायचे. घरी आल्याबरोबर कपडे काढून ठेऊन साधी बंडी व पायजमा वापरायचा. प्रथम अकाकीला हे सर्व करताना–स्वतःच

केलेले नियम–पाळताना जड गेलं. पण हळूहळू सवय झाली. त्यानं संध्याकाळचं जेवणसुद्धा बंद केलं. त्याचं पोट सध्या अध्यात्मानं भरत होतं. कारण हे सारं आपण आपल्या नव्या ओव्हरकोटाची किंमत भरून काढण्यासाठी करत आहोत याचं त्याला फार मोठं समाधान होतं. त्याचं सारं व्यवधान नव्या कोटाच्या घेतलेल्या निर्णयानं परिपूर्ण झालं होतं. जणू काही त्याचं लग्न झालं होतं व त्याला कोणी साथ देणारं जिवाभावाचं माणूस त्याच्या आयुष्यात येणार होतं का? त्याचा एकटेपणा जाऊन त्याच्या सुखदु:खाशी समरस होणारं कोणी जीवनसाथी येणार होता का? तसं काही नव्हतं! तर त्याचा तो नव्या कापडाचा सोनेरी पट्टी लावलेला कॉलरच्या नव्या फॅशनच्या ओव्हरकोटचं आगमन होणार होतं.

अलीकडे अकाकी आनंदी व उत्साही दिसायचा. एकाद्या ध्येयवादी माणसाप्रमाणे तो आपलं उद्दीष्ट गाठण्याबाबत निश्चयी दिसायचा. त्याच्या हालचालीवरून व त्याच्या चेहऱ्यावरून पूर्वी दिसणारी शंकाकूल अस्वस्थता नाहिशी झाली होती. अनिश्चितता व अनिर्णयता या त्याच्या मूळ स्वभावाचे पैलू पार नाहिसे झाले होते. कधी कधी त्याच्या डोक्यात विचार यायचे; अर्थात नव्या कोटासंबंधी आणि त्याच्या डोळ्यात वेगळीच चमक दिसायची. आपल्या कोटाला सोनेरी पट्टीची काय जरूर अशा तऱ्हेचे विचार नव्या ओव्हरकोटासंबंधी आणि डोक्यात यायचे. कामावरचं त्याचं लक्षही उडालं होतं. एकदा तर त्याच्या हातून चूक होणार होती त्यावेळी तो 'अरे देवा ' असं चक्क मोठ्याने ओरडला व क्रूसाची खूण केली.

महिन्यातून कमीत कमी एक वेळा तरी तो पेट्रोविचच्या घरी त्याला भेटायला जात असे. कोटाला कपडा कसला घ्यायचा. कुठल्या रंगाचा किती किमतीचा घ्यायचा चर्चा करत असे. त्याला काळजी वाटत असे पण पेट्रोविचशी चर्चा करून घरी परतल्यावर तो समाधानी दिसे. थोड्याच दिवसात आपण पुरेसे पैसे जमा करू शकू व आपला कोट तयार होईल याबद्दल तो निश्चिंत झाला होता.

पण ही सारी काळजी फार थोड्या दिवसात एकाद्या स्वप्नाप्रमाणे संपली. अकाकीच्या वरिष्ठाने त्याला सुट्टीचा बोनस म्हणून नुसते चाळीस-पंचेचाळीस रुबल न देता चांगले साठ रुबल दिले. खरोखर साठ रुबल दिले! त्यामुळे गोष्टी

बऱ्याच सोप्या झाल्या. आणखी काही महिने काटकसर केली की सर्व काही ठीक होईल. अकाकीला हवे असलेले ऐंशी रुबल त्याच्याकडे जमा झालेच, असं समजा. या विचारानं नेहमी संथ वाहणारी त्याची नाडी धडधडायला लागली. दुसऱ्याच दिवशी तो पेट्रोविच बरोबर दुकानात कापड खरेदीला गेला. त्यांनी झकासपैकी कापड खरेदी केलं. आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. जवळपास सहा महिने ते दोघे या विषयावर चर्चा करत होते. कापडाच्या किंमतीची प्रत्येक महिन्याला चौकशी करत. हेतू हा की कापड आपल्याला महाग मिळू नये, पण कापड खरोखर वाजवी किंमतीला मिळालं असं पेट्राविचनं सुद्धा कबूल केलं. अस्तरासाठी त्यांनी कॅलिकोचा कपडा पसंत केला. पेट्रोविचच्या मनात तो रेशमी कपड्यापेक्षा जास्त मऊ असून चांगला टिकावू व चकचकीत होता. कॉलरला लावायला मार्टेन न घेता चांगल्यापैकी मांजराची फर घेतली. लांबून ती हुबेहूब मार्टेनसारखी दिसत होती.

पेट्रोविचनं कोट दोन आठवड्यात तयार केला. व्यवस्थित शिवणी घालायच्या होत्या म्हणून त्याला जरा वेळ लागला. पेट्रोविचनं शिवणी रेशमी धाग्यानं व अत्यंत काळजीपूर्वक घातल्या होत्या. त्या बळकट आहेत का नाही ते प्रत्यक्ष दातानी चावून पाहिलं होतं. शिलाईचे पेट्रोविचने फक्त बारा रुबल्स घेतले. अर्थात त्यापेक्षा कमी घेणं शक्यच नव्हतं.

पेट्रोविचनं तो कोट अकाकीकडे नेमका कोणत्या दिवशी आणला. ते सांगणं जरा कठीण आहे. पण तो दिवस अकाकीच्या आयुष्यातला फार महान दिवस होता हे मात्र खरंच. अकाकी कचेरीत जाण्याच्या तयारीत होता. थोडा वेळ आधी पेट्रोविच सकाळीच-तो कोट घेऊन आला. कसबी शिंपी आपलं काम मालकाला स्वतः पोचवायला जातात. पेट्रोविचचा गंभीर चेहरा अकाकीनं कधी पाहिला नव्हता. आपण काम सचोटीनं व काळजीपूर्वक केलंय असं तर पेट्रोविचला दाखवायचं होतंच; शिवाय जुने कपडे ठिगळ लावून दुरुस्त करणारे व खरे कारागीर यातला जणू फरक दाखविण्याचा अविर्भाव पेट्रोविचच्या तोंडावर होता.

हवेत गारठा वाढू लागला होता व हिमवर्षावही सुरू झाला होता. त्यामुळे त्या दिवशी कोट आला ते अगदी स्वागतार्हच होतं. पेट्रोविचनं कोट एका स्वच्छ

रुमालात गुंडाळून आणला होता. कोट बाहेर काढून त्यानं रुमाल खिशात ठेवला. घडी पूर्ण उलगडून कोट पेट्रोविचनं अकाकीच्या खांद्यावर ठेवला. घडी पूर्ण उलगडून कोट अकाकीच्या अंगाभोवती गुंडाळला. अकाकीला तो व्यवस्थित बाह्या वगैरे घालून पहायचा होता. त्यानं पेट्रोविचच्या मदतीनं कोट अंगावर चढवला. कोट अकाकीच्या अंगावर अगदी ठीक बसला.

अकाकी अकायेविचला आपण खूप वर्षापासून ओळखतो. आपलं दुकान एका गल्लीत आहे. त्यावर पाटीसुद्धा लावलेली नाही म्हणून आपण कोटाची शिलाई कमी लावली. अकाकीनं एकाद्या मोठ्या दुकानातून असा कोट शिवून घेतला असता तर कमीतकमी सत्तर ते पंच्याहत्तर रुबल शिलाई त्याला द्यावी लागली असती असे सुनवायची संधी पेट्रोविचनं दवडली नाही. अकाकीनं पेट्रोविचला ठरलेली रक्कम दिली. कारण कचेरीत जाण्याच्या गडबडीत असल्यामुळे पेट्रोविचशी चर्चा करायला त्याला वेळ नव्हता. मोठ्या रकमा सांगून गिऱ्हाईकावर छाप पाडायची पेट्रोविचची सवय त्याला माहीत होती. त्यानं पेट्रोविचचे आभार मानले व तो कचेरीला जाण्यासाठी बाहेर पडला.

पेट्रोविचही त्याच्या मागून निघाला. रस्त्यावर उभं राहून अकाकीच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तो पहात राहिला. नंतर थोड्या अवधीने दुसऱ्या गल्लीत पुढे जाऊन पुढच्या बाजूनं आपली कामगिरी कशी दिसते ते त्यानं पाहिलं आणि समाधानाचा सुस्कारा सोडला.

अकाकी तर जणू हवेतच तरंगत चालला होता. आपल्या अंगावर आज नवा कोट आहे हे तो एक क्षणभरही विसरू शकत नव्हता. तो स्वतःशीच स्मित करत खुषीत चालला होता. कोट उबदार तर होताच, शिवाय फारच छान दिसत होता. त्या सुखावलेल्या अवस्थेत आपण आपल्या कचेरीत केव्हा येऊन पोचलो ते अकाकीला कळलंच नाही. आत आल्यावर त्यानं कोट काढला आणि दरवानाच्या स्वाधीन केला. अकाकीच्या नव्या ओव्हरकोटाची बातमी हां हां म्हणता साऱ्या खात्यात पसरली. अकाकीनं अखेर तो जुना कोट टाकून दिला व नवा बनवून घेतला याचं साऱ्यांना अचंबा वाटला. सर्वांनी अकाकीचा नवा ओव्हरकोट बघायला मधल्या मोठ्या दालनात गर्दी केली. सर्वांनी त्याच्यावर अभिनंदनाचा व सदीच्छांचा

खूप वर्षाव केला. अकाकीनं हसून त्या सगळ्यांचा मनापासून स्वीकार केला पण नंतर त्याला अवघडल्यासारखे झाले. त्याच्या भोवती जमलेल्या सर्वांनी कोटाच्या निमित्तानं सर्वांना झकास पार्टी द्यावी असा आग्रह धरला. बिचारा अकाकी गोंधळून गेला. त्यांना काय उत्तर द्यावं ते अकाकीला समजेना. हा नवा कोट नसून जुनाच आहे असं सांगायचा अकाकी प्रयत्न करू लागला. शेवटी खात्यातला दुय्यम अव्वल कारकून मध्ये पडला. हाताखालच्या लोकांसाठी काही करायला आपल्याला कमीपणा वाटत नाही उलट आपल्याला आनंदच वाटतो असं त्याला सिद्ध करायचं होतं. '' मित्रानो अकाकी अकायेविचसाठी मी तुम्हा सर्वांना पार्टी देईन.आज माझा वाढदिवस पण आहे. तुम्ही सर्वजण आज माझ्याकडे चहाला या.'' सर्व कारकून मंडळीनी वरिष्ठाचं अभीष्टचिंतन केलं व पार्टीचं निमंत्रण स्वीकारलं. अकाकीनं प्रथम आपल्या हजर राहण्यांची असमर्थता दाखवली. परंतु सर्वांनी गिल्ला केला की हे काही त्याला शोभत नाही! त्याच्या नव्या कोटासाठी साहेब पार्टी देतात आणि तू हजर राहणार नाही? वारे वा! पार्टीला त्यानं हजर राहिलंच पाहिजे. मनातून अकाकीला खूप आनंद झाला. पार्टीला हजर राहण्याचं त्यानं मान्य केलं. शिवाय त्याला तो नवा ओव्हरकोट घालून रस्त्यानं चालायची संधी मिळणार होती.

□ □

## प्रकरण चौथे

अकाकीच्या आयुष्यात तो दिवस म्हणजे मोठी पर्वणीच होती. तो अगदी खुषीत घरी आला. त्यानं आपला कोट काढून अडकवून ठेवला. थोडावेळ त्या कोटाकडे तो अतिशय कौतुकानं पहात राहिला. त्यानं आपला जुना कोट काढला आणि तो दोन्ही कोटांकडे आळीपाळीने पाहून तुलना करू लागला. एव्हाना जुन्या कोटाची पार वाट लागली होती. दोन्ही कोटांची अवस्था बघून '' छे! केवढा हा फरक! '' असं स्वतःशीच पण मोठ्यांदा म्हणाला. जेवतानाही आपल्या जुन्या कोटाची अवकळा व त्याचा विचार येऊन तो स्वतःशीच हसत होता. त्या दिवशीचं जेवण त्याला फार रुचकर लागलं. त्या दिवशी नकला करायचे कामही त्यानं अजिबात केलं नाही.उलट आपल्या बिछान्यावर पडून आराम करण्यात आनंद घेतला. संध्याकाळी कपडे करून, नवा कोट चढवून तो पार्टीला जाण्यास निघाला.

त्या अव्वल उप अधीक्षकाचं घर कुठे होतं ते आम्हाला नक्की सांगता येणार नाही. आमची स्मरणशक्ती चांगलीच कमी होऊ लागली आहे. त्यातही या सेंट पीटर्सबर्ग शहरातले अनेक रस्ते व असंख्य इमारती यांची आमच्या डोक्यात चिक्कार गल्लत झाली आहे. त्यामुळे त्या सनदी अव्वल उप अधीक्षकाचं घर कुठे असेल ते बरोबर सांगता येणार नाही. काहीही असलं तरी हे महाशय कुठल्यातरी उत्तम वसाहतीतच राहात असले पाहिजेत. अकाकीच्या घरापासून ते नक्कीच दूर असणार.

अकाकी घरातून निघाल्यावर दोन-तीन रस्ते ओलांडत गेला. या रस्त्यांवर फारसा उजेडही नव्हता. दिवे फारच कमी होते. रहदारीही नव्हतीच म्हटलं तरी

चालेल. मग तो मोठ्या रस्त्यावर आला. इथे खूप दिवे होते. भरपूर उजेडही होता. माणसांची रहदारी–गर्दीच म्हणाना, बरीच होती. आकर्षक पोषाखातले स्त्री-पुरुष इकडून तिकडे जाताना दिसत होते. वाहन चालवणारेही अगदी चांगल्या प्रकारे गणवेष घालून त्यांची नीटनेटकी वाहनं चालवत होते. कोणी गरीब-गबाळे दिसत नव्हते. वाहनं इकडून तिकडे फिरताना रस्त्यावर पडलेल्या बर्फावर चाकांचा मजेदार आवाज येत होता.

अकाकी त्या सर्व दृश्याकडे मोठ्या कुतुहलानं पहात होता. असं समृद्ध दृश्य त्यानं कधीच पाहिलं नव्हतं. कित्येक वर्षांत अशा संध्याकाळच्या वेळी आपली खोली सोडून कधी तो बाहेर गेलाच नव्हता. ते सारं पाहून तो हरखून गेला. झगझगीत दिवे लावलेल्या एका दुकानासमोर तो उभा होता. त्या दुकानातल्या एक तसबिरीनं त्याचं लक्ष वेधून घेतलं होतं. ते चित्र एका सुंदर स्त्रीचं होतं. त्या स्त्रीनं आपल्या पायातला बूट काढला होता व तिचा पाय पूर्ण उघडा होता. पाय अगदी बांधेसूद व कमनीय होता. तिच्या मागे एक अत्यंत रुबाबदार व राजबिंडा पुरुष एका उघड्या दरवाजातून तिच्याकडे अनिमीष नेत्रांनी पहात होता. असं एकंदर ते चित्र होतं. अकाकीनं ते चित्र पाहून मानेला झटका दिला व स्वतःशीच हसला. नंतर तो आपल्या मार्गाला लागला. अकाकी का बरं हसला असेल? आज जे त्यानं पाहिलं असं दृश्य त्यानं यापूर्वी आयुष्यात कधीच पाहिलं नसेल. पण असलं काही पहायला मिळावं ही इच्छा आपल्या प्रत्येकाच्या मनात खोलवर दडलेली असते. पण अकाकीनं चारचौघांसारखा विचार केला असेल " हे फ्रेंच लोक म्हणजे असेच हं! त्यांनी एकाद्या गोष्टीचा त्या तसल्या (चित्रातल्या दृष्यासारखा) गोष्टीचा....." पण तो स्वतःशी तसं काही बोलला नाही. एकाद्याच्या मनात शिरून त्याच्या विचारांचा आपल्याला काही मागोवा घेता येत नाही. असो, शेवटी अकाकी त्या अव्वल उप अधीक्षकाच्या घरी येऊन पोचला.

तो अव्वल उप अधीक्षक चांगलाच सुस्थितीत असला पाहिजे. तो राहत असलेल्या घराच्या जिन्यावर मोठा दिवा टांगलेला होता. यजमान दुसऱ्या

माळ्यावर राहात होते. अकाकीनं प्रवेश केला तो एका मोठ्या दिवाणखान्यात. एका बाजूला बुटांच्या रांगा लावलेल्या होत्या. दिवाणखान्याच्या मधोमध एक मोठं सॅमोव्हर (रशियन पद्धतीची किटली) ठेवलेलं होतं. त्यातील उकळणाऱ्या पाण्याचा आवाज येत होता. भिंतीवर ओळीनं निळनिराळ्या पद्धतीचे (फॅशनचे) रुपेरी-सोनेरी पट्ट्या लावलेले ओव्हरकोट टांगून ठेवलेले दिसत होते. भिंतीच्या दुसऱ्या बाजूनं बोलण्याचे आवाज ऐकू येत होते. दार उघडलं गेलं व एक नोकर एका तबकात बिस्किटं, दुधाचं भांडं व रिकामे चहाचे पेले घेऊन दिवाणखान्यात आला. उघडलेल्या दरवाजाच्या दिशेने आता बोलण्याचे मोठ्यानं आवाज येऊ लागले. अकाकीच्या खात्यातले बरेच लोक आधीच लवकर आले असले पाहिजेत. त्यांची चहाची पहिली फेरी संपलेली दिसत होती.

अकाकीनं आपला कोट काढून इतर कोटांच्या बाजूला अडकवला. त्यानं त्या खोलीत प्रवेश केला तेव्हा एकाच वेळी त्याच्या डोळ्यांना पेटलेल्या मेणबत्त्या; खात्यातले इतर लोक कोणी पाईप ओढत, कोणी छोट्या टेबलावरील पत्त्यांशी चाळा करत असं दृष्य, तर कानांना गप्पागोष्टींचे आवाज; खुर्च्या, इकडून तिकडे सरकवल्याचे आवाज ऐकू आले. अकाकी तसाच उभा होता. आपण काय करावं ते त्याला समजेना. इतक्यात सर्वांच लक्ष त्याच्याकडे गेलं आणि सर्वांनी त्याचं आनंदाने स्वागत केलं. त्याचा ओव्हरकोट कसा आहे ते पहायला सर्वजण दिवाणखान्यात धावले. सर्वांनी त्याच्या ओव्हरकोटाची मुक्तकंठानं स्तुती केली. अकाकी तसा लाजाळू आणि भित्र्या स्वभावाचा, पण आपल्या कोटाची स्तुती ऐकून आनंदानं मोहरून गेला. नंतर ते सर्वजण त्याला व त्याच्या ओव्हरकोटाला विसरले आणि पत्ते खेळायला टेबलाभोवती जमले.

लोकांच्या बोलण्याचे आवाज, गोंगाट, गडबड हे सारं अकाकीला अगदीच अपरिचित होतं. तो गोंधळून गेला होता. बसावं का उभं राहावं, कसं बसावं, कुठे बसावं हे त्याला सुचेनाच. शेवटी पत्ते खेळत असलेल्या एका घोळक्याजवळ तो

जाऊन बसला. प्रथम त्याने पत्ते न्याहाळले. नंतर एक एक करून सर्व खेळाडूंची तोंडं न्याहाळली. थोड्याच वेळात त्या सर्व गाष्टींचा त्याला कंटाळा आला आणि तो जांभया देऊ लागला. रात्र वाढायला लागली होती व त्याची झोपण्याची रोजची वेळ टळू लागली होती. तो अस्वस्थ झाला. घरी परतण्यासाठी त्यानं यजमानाची परवानगी मागितली पण सारेजण गिल्ला करू लागले. " वारे वा, तुझ्या नव्या ओव्हरकोटानिमित्त खास शॅम्पेन घ्यायची आहे, त्याशिवाय जायचं नाही." त्याला थांबावंच लागलं.

थोड्या वेळानं यजमानांनी खाण्याचे पदार्थ मागविले. मासे,मटणाचे प्रकार तसेच माव्याचे केक आणि शॅम्पेन आणण्यात आली. सर्वांनी यथेच्छ खाल्लं. अकाकीला शॅम्पेनचे दोन ग्लास प्यायला लावले. शॅम्पेन घेतल्यावर त्या वातावरणात अकाकीला मजा वाटायला लागली. मध्यरात्र उलटून गेली व घरी जाणं आता योग्य आहे ही जाणीव त्याही स्थितीत त्याला होती. काही कारणानं यजमान आता आपल्याला थांबवणार नाही अशी समजूत करून घेऊन इतरांच्या नजरा चुकवून त्यानं हळूच काढता पाय घेतला. दिवाणखान्यात येऊन त्यानं जमिनीवर पडलेला आपला ओव्हरकोट उचलला. त्याला लागलेली धूळ झटकली. कोट अंगावर चढवून जिना उतरून तो रस्त्याला लागला.

रस्त्यावर अजून खूपच उजेड होता. काही दुकानं उघडी होती. रात्रंदिवस चालणारे काही अड्डे (क्लब्ज्) उघडे होते आणि बोलण्याचे आवाज येत होते. काहींचे दरवाजे बंद होते, पण फटीतून आतील उजेडाची तिरीप आलेली दिसत होती. माणसांची, बहुधा नोकरलोकांची आवराआवर चालली असावी. तो अगदी अतिशय खुषीत चालता चालता एकाएकी एका बाईच्या पाठोपाठ धावू लागला. ती बाई त्याच्या शेजारून धावत गेली होती. आपण का धावलो हे त्याला कळेना. एकाएकी येवढं बळ आपल्याला कुठून आलं. मग तो परत हळूहळू चालू लागला. मोठा रस्ता संपून तो त्या अंधाऱ्या रस्त्यावर आला. त्या रस्त्यावर दिवसाही फारशी

वर्दळ नसे. आता तर अर्धवट अंधार व निर्मनुष्य. त्यामुळे तो रस्ता फारच भयाण दिसत होता. दिवे बहुतेक विझून गेलेले होते. तेलाचा खर्च वाचविण्यासाठी नगरपालिका बहुधा दुर्लक्ष करीत असावी. यानंतर अकाकी जुनाट लाकडाची घरं असलेल्या रस्त्याला लागला. दुतर्फा तसलीच जुनी घरं, त्यांच्या दारं-खिडक्या बंद असलेल्या दिसत होत्या. कुठेही उजेडाचा मागमूस नव्हता. फक्त रस्त्यावर पडलेलं बर्फ कुठे कुठे चकाकत होतं. हळूहळू तो एका मोठ्या चौकात येऊन पोचला. तो चौक त्याला एकाद्या वैराण वाळवंटासारखा भासला, कारण मनुष्य वस्तीची कोणातीही खूण दूरवर दिसत नव्हती.

अकाकीला लांबवर कुठंतरी दिव्याचा उजेड दिसला. तो उजेड रात्रीची गस्त घालणाऱ्या शिपायाच्या लाकडी टपरीतल्या दिव्याचा असावा. अकाकीला त्या चौकातून-जाताना अनामिक भीती वाटत होती. काहीतरी भयानक घडेल असं त्याला मनातून सारखं वाटू लागलं. त्यानं एकदा मागे वळून पाहिलं, समोर पाहिलं, आजूबाजूला पाहिलं. आपण जणू सर्व बाजूंनी समुद्राच्या पाण्यानं वेढले गेलो आहोत असं त्याला वाटू लागलं. इकडेतिकडे आपण न पहाणंच बरं असा विचार करून तो डोळे मिटून चालू लागला. अजून चौक संपायला किती चालावं लागणार आहे हे पाहण्यासाठी त्यानं डोळे उघडले. चौकाचा शेवट दिसण्याऐवजी त्याला त्याच्या पुढ्यात आडदांड व भरदार मिशा असलेली दोन माणसं दिसून आली. ती कोण असावीत हे त्याला अंधारात दिसू शकलं नाही. भीतीनं त्याची बोबडी वळली. त्याची छाती जोरानं धडधडू लागली. "हा पाहिलास माझा ओव्हर-कोट !" असं भसाड्या आवाजात एकजण म्हणाला. त्यानं अकाकीची कॉलर पकडली. "धावा, धावा" अस अकाकी म्हणणार, येवढ्यात दुसऱ्यानं आपली हाताची मूठ अकाकीच्या तोंडावर मारली. बापरे! ती मूठ म्हणजे एखाद्या शासकीय अधिकाऱ्याच्या डोक्यायेवढी होती. "तू कसा ओरडतोस ते पहातो!" असं धमकावलं. त्याचा ओव्हरकोट त्या चोरांनी ओरबाडून घेतला. त्याला लाथा घालून

खाली पाडलं व ते अंधारात पसार झाले. अकाकी बर्फावर खाली पडला होता. त्याला काहीवेळ शुद्धही नव्हती. जरा वेळानं तो शुद्धीवर आला आणि उठून उभा राहिला. आजूबाजूला कोणीहीं नव्हतं आणि तिथे भयानक थंडी वाजत होती. मदतीसाठी त्यानं मोठ्यांदा ओरडायचा प्रयत्न केला, पण त्याचा आवाज चौकाच्या टोकापर्यंतसुद्धा पोचू शकला नाही. तो ओरडत, धावत गस्तवाल्या शिपायाच्या टपरीकडे गेला. गस्तवाला शिपाई टपरीच्या बाहेर आपल्या काठीवर रेलून अकाकीच्या लांबून धावत येणाऱ्या आकृतीकडे पाहात होता. शिपायाच्या टपरीजवळ पोचल्यावर धापा टाकत ओरडून ओरडून भरलेल्या आवाजात तो शिपायावर खेकसला, '' तू झोपला होतास काय? तुझ्यादेखत मला चोरांनी लुटलं, ते तू पाहिलं नाहीस? '' तसं काही होताना आपण पाहिलं नाही पण दोन माणसांनी तुम्हाला थांबवलं, चौकाच्या मधोमध थांबवलं, येवढं पाहिलं आणि ते तुमचे कोणी स्नेही असतील अस वाटलं .'' शिपायाने उत्तर दिलं. यापलीकडे अकाकीला काही मदत करण्याऐवजी अकाकीनं तिथे थांबून त्या शिपायाला दोष देण्याऐवजी उद्या सकाळी पोलीस चौकीत जाऊन फौजदाराला गाठावं व आपली तक्रार नोंदवावी. फौजदार योग्य ती कारवाई करून त्या चोरांना शोधून काढायला मदत करतील, असा अगदी शहाणपणाचा सल्ला दिला.

बिचारा अकाकी अकायेविच त्या गोंधळलेल्या मनःस्थितीत कसबसा घरी येऊन पोचला. त्याच्या डोक्यावरचे तुरळक केस पार विस्कटले होते. त्याच्या छातीवर, अंगातील सदऱ्याच्या बाहीवर व पाटलोणीवर सगळीकडे बर्फ चिकटलेलं होतं. अकाकीनं जोरजोरात दार ठोठावलं. बिचारी घरमालकीण लगबगीनं दार उघडायला उठली. घाईनं तिनं एकाच पायात चप्पल घातली. एका हातानं अंगावरची ओढणी पकडून तिनं दार उघडलं. दारात उभ्या असलेल्या अकाकीचा अवतार पाहून ती धास्तावली आणि मागे सरकली. आपल्यावर काय भयंकर प्रसंग गुदरला ते अकाकीनं धापा टाकत तिला कसंबसं सांगितलं. अकाकीनं

फौजदाराकडे जाण्यापेक्षा सरळ मुख्य पोलीस अभियंत्याकडे जावं असं तिचं मत पडलं. तिच्या मते फौजदार त्याला थापा मारून लुबाडील, काम काही होणार नाही. अव्वल पोलीस अंमलदाराला मालकीणबाई थोड्याशा ओळखत होत्या. त्यांची पहिली स्वयंपाकीण ॲना नावाची फिनिश मुलगी त्या पोलीस अंमलदाराकडे नर्स म्हणून काम करते. शिवाय तो अंमलदारसाहेब आपल्या दारावरून गाडीत बसून अनेकदा जातो. प्रत्येक रविवारी तो चर्चला येतांना तिथं प्रार्थनेच्या वेळी सर्वांकडे मोठ्या प्रेमळपणानं पाहात असतो. त्यामुळे तो स्वभावानं चांगला असेल, असं बाईचे मत पडलं.

हा सर्व उपदेश ऐकून अकाकी निराश झाला. कसाबसा आपल्या खोलीत जाऊन पलंगावर आडवा पडला. त्याला झोप आली नाही. झोप येणं शक्यच नव्हतं. ती रात्र त्यानं कशी घालवली असेल ते दुसऱ्याच्या भूमिकेत शिरून विचार करणाऱ्यांनाच समजू शकेल. आम्ही ते वाचकांवरच सोडून देतो.

सकाळी उठून तो उच्च पोलीस आयुक्तांच्या घरी गेला. साहेब अजून उठले नाहीत अशी त्याची बोळवण करण्यात आली. तो पुन्हा दहा वाजता गेला, तरीही ते झोपलेलेच आहेत, उठले नाहीत असं त्याला सांगण्यात आलं. तो अकरा वाजता तिसऱ्यांदा गेला, तेव्हा साहेब बाहेर गेले आहेत असं त्याला सांगण्यात आलं. शेवटी तो दुपारच्या जेवणाच्या वेळी गेला, पण स्वागत कक्षातले लोक त्याला आत घेईनात. त्याचं काय काम आहे, तो कशासाठी आलाय, ते त्यांना समजल्याशिवाय त्याला प्रवेश दिला जाणार नाही, असं सांगण्यात आलं.

आपण आता जरा रुद्रावतार धारण केला पाहिजे असं अकाकीला प्रथमच आयुष्यात वाटलं. आपण फलाण्या खात्यातून कचेरीच्या कामासाठी साहेबांना भेटायला आलो आहोत. आपल्याला कोणी रोखलं तर तक्रार केली जाईल, परिणाम चांगला होणार नाही, असं बोलल्यावर ते त्याला अडवू शकले नाहीत. एकजण आत जाऊन साहेबांना वर्दी देऊन आला.

अकाकीच्या हकीगतीचा साहेबांनी भलताच अर्थ काढला. इतक्या रात्री तू कुठे गेला होतास असे संदर्भ नसलेले प्रश्न विचारत राहिला. हे साहेब आपली तक्रार नोंदवून घेतील व आपल्याला काही मदत करतील अशी त्याला काहीही आशा वाटत नव्हती. तो निराश होऊन परत गेला.

□ □

## प्रकरण पाचवे

आयुष्यात प्रथमच बिचारा अकाकी त्या दिवशी कचेरीत गैरहजर राहिला. दुसऱ्या दिवशी तो त्याचा जुनाच कोट घालून कामावर गेला. कोट आता जास्तीच वाईट झाला होता. स्वतः अकाकी कमालीचा थकलेला व दुःखीकष्टी दिसत होता. त्याच्या कोटाची अशा तऱ्हेनं चोरी झालेली ऐकून त्याचे सहकारी हळहळले. त्यातही काहीजण त्याची टर उडवून त्याच्या दु:खावर डागण्या देणारे भेटले. काही जणांनी सहानुभूती दाखवली. त्यांनी नवीन कोट बनवण्यासाठी पैसे जमा करायचं ठरवलं पण फारसे पैसे जमले नाहीत. कारण त्या सर्वांनी त्या खात्याच्या डायरेक्टरचे तैलचित्र बनवायला व एक कसलंसं पुस्तक घेण्यासाठी आधीच फंड जमा केला होता. ते कसलंसं पुस्तक खात्यातल्या लोकांनी घ्यावं असं अव्वल कारकूनानं सुचवलं होतं. ते अव्वल कारकून त्या लेखकाचे जिगरी दोस्त होते त्यामुळे त्यांना वर बढती मिळणं थोडं सोपं झालं असतं. असो! त्यामुळे बिचाऱ्या अकाकीसाठी जमलेली रक्कम अगदीच थोडी होती. त्यातही एका सहकाऱ्याला त्याची दया आली. आणि त्यानं त्याला मदत करायचं ठरवलं. अकाकीनं जिल्हा पोलीस अधिकाऱ्याकडे जाण्यात काही अर्थ नाही; कारण कदाचित बढती मिळविण्यासाठी तो अधिकारी अकाकीचा कोट शोधून काढण्याची शिकस्त करील आणि कदाचित त्यात यशस्वीही होईल पण कोट परत मिळण्यासाठी अकाकीला कायदेशीर पुरावे द्यावे लागतील. त्याऐवजी अकाकीनं एका अती महत्त्वाच्या व्यक्तीकडे जाऊन भेटावं. ही अती महत्त्वाची व्यक्ती बरोबर योग्य त्या व्यक्तीला व अधिकाऱ्यांना सर्व हकीगत लेखी व तोंडी समजावून सांगेल त्यामुळे या सगळ्या गोष्टी सुलभपणे सुटायला मदत होईल.

अकाकीनं त्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीकडे भेटायला जायचं ठरवलं. बिचारा! दुसरं तरी काय करणार? ही अती महत्त्वाची व्यक्ती कोण व ती व्यक्ती कुठल्या

हुद्यावर काम करत होती हे काही समजू शकलं नाही. ही अत्यंत महत्त्वाची व्यक्ती कोण हे गूढ आजही उकललेलं नाही. ही अत्यंत महत्त्वाची व्यक्ती यापूर्वी महत्त्वाची नव्हती. ती अचानक नुकतीच महत्त्वाची झाली होती. अलीकडे सुद्धा त्याचा हुद्दा इतरांच्या तुलनेत फारसा महत्त्वाचा मानला जात नाही. पुष्कळदा काही लोक आपण फार मोठे आहोत असं इतरांना भासवत असतात. तद्वतच या अत्यंत महत्त्वाच्या म्हणवणाऱ्या व्यक्तीनं आपला बडेजाव असाच वाढवून ठेवला होता. त्यासाठी त्यानं काही नियम केले होते.

तो जेव्हा कचेरीत प्रवेश करी; त्यावेळी हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी त्याला पायऱ्यावर उभं राहून सलामी दिली पाहिजे. आधी अर्ज दाखल केल्याशिवाय कोणालाही मुलाखतीसाठी प्रवेश दिला जाऊ नये. प्रत्येक गोष्ट घालून दिलेल्या नियमानुसार काटेकोरपणे झाली पाहिजे. त्यात जराही गफलत होता कामा नये.

एखादं काम करून घ्यायचं असेल तर त्या फलाण्या अधिकाऱ्यानं कुठल्याही नामधारी कौन्सिलरच्या चिटणीसाला प्रथम भेटायचं आणि मग त्यानं वरच्या साहेबाला भेटायचं; अशी एकंदर साखळी असते.

आमच्या या पवित्र देशात (रशिया) प्रत्येक जण एकमेकाची टिंगल करत असतो. हे सांगायला वाईट वाटतं. पण प्रत्येक जण आपल्या वरिष्ठाची नक्कल करण्याचा अट्टाहास करत असतो. एक गोष्ट सांगतात की; कोणा एका नामधारी आमदाराला कुठल्यातरी एका छोट्याशा कचेरीचा प्रमुख म्हणून नेमलं होतं. त्यानं त्याच कचेरीत विभागणी करून स्वतःसाठी एक खोली तयार करून घेतली आणि ' हजेरीची जागा ' अशी वर पाटी लावून घेतली. इतकंच काय पण दारावर दोन दरवान लाल कॉलरचे कडक गणवेष घालून सतत दाराच्या बाहेर उभे केले. आमदाराला कोणी भेटायला येतील त्यांना दार उघडून आत घ्यायचं. पण खोली येवढी लहान होती की, तिथे लिहिण्यासाठी एक टेबल ठेवायला जेमतेम जागा होती.

त्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीची वागण्याची रीत एकंदर छाप पाडणारी होती; पण त्यात फारशी हुषारी नव्हती. त्याची सगळी भिस्त कडक शिस्तीवर होती. "शिस्त, शिस्त आणि शिस्त!" तो प्रथम मोठ्यानं बोलायचा आणि शेवटी ज्याच्याशी बोलत असेल त्या व्यक्तीच्या चेहऱ्याकडे बारीक नजरेनं रोखून

बघायचा. येवढ्या कडक शिस्तीची खरोखरी जरुरी नव्हती, कारणही नव्हतं. त्यामुळे त्याच्या कचेरीत त्याच्या हाताखाली काम करणारे कर्मचारी सतत दडपणाखाली भीतीनं थरथरत असत. तो लांबून येताना दिसला की ते सारे कर्मचारी आपापल्या जागी हातातलं काम थांबवून उभे राहात. तो आपल्या जागेवर पोहोचेपर्यंत त्याच स्थितीत राहात. आपल्या खात्यातल्या हाताखालच्या कर्मचाऱ्याशी बोलताना देखील तो अतिशय करड्या भाषेत बोले. त्याच्या बोलण्यात सदैव ही तीन सुभाषितं (?) असत. " तुम्हाला धाडस तरी कसं झालं राव? तुमच्या समोर कोण उभा आहे याची जाणीव आहे का तुम्हाला? तुम्ही कुणाशी बोलत आहा, हे ध्यानात आहे का? "

तसा तो मनाचा चांगला माणूस होता. आपल्या सहकाऱ्यांशी खेळीमेळीनं वागे कुणाचं कामही करून देत असे. परंतु या मिळालेल्या बढतीनं त्याच्या डोक्यात जणू वारं शिरलं होतं. त्या वरच्या हुद्यामुळे तो गोंधळून गेला होता. काय करावं ते त्याला सुचत नव्हतं. आपल्या समान हुद्याच्या व्यक्तीबरोबर तो अगदी साधेपणानं, सभ्यपणानं वागे. कधी विक्षिप्तपणा करीत नसे, पण खालच्या श्रेणीतल्या लोकांच्या बरोबर वागायचा प्रसंग आला तर लगेच त्याच्यात बदल होई. तो एकदम गप्प होई व त्याची दयनीय अवस्था होई. काय करावं ते त्याला सुचत नसे. चांगली करमणूक करून घेण्यात आपण आपला वेळ खर्च केला असता असं त्याला वाटे. आपल्याहून कनिष्ठ श्रेणीतल्या लोकांशी आपण बोलावं, त्यांच्यात मिसळावं अशी पुष्कळदा त्याला अनिवार इच्छा होई! पण तो स्वतःला आवर घाली. असं केलं तर आपल्याला कमीपणा येईल. उगाचच लोकांच्यात आपणहून मिसळल्यानं ते सलगी दाखवल्यासारखं होऊन लोकांचा गैरसमज वाढेल. त्यामुळे आपल्या व्यक्तित्वाला कमी लेखलं जाईल. अशा उलटसुलट विचारांनी तो एकटा पडला होता. आपला हुद्दा संभाळण्यासाठी त्याला सतत गंभीर राहावं लागत असे. बोलायचं झालंच तर ' होय ' ' नाही ' या पलीकडे तो जात नसे. अशा वागण्यामुळे त्यानं; ' एक कंटाळवाणं व्यक्तिमत्व ' असा अतुलनीय लौकीक मिळवला होता.

अशा या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीकडे अकाकीला जावं लागलं. दुर्दैवानं अकाकीनं भेटण्याची वेळ चुकीची शोधून काढली होती. अकाकीच्या दृष्टीने ती

वेळ घातक असली तरी त्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीच्या दृष्टीनं ती घातक नव्हती. अकाकी त्या कचेरीत पोचला तेव्हा ही अत्यंत महत्त्वाची व्यक्ती अनेक वर्षांनी न भेटलेल्या परंतु नुकत्याच सेंट पीटर्सबर्गला दीर्घ कालावधीनंतर परत आलेल्या आपल्या बालमित्राशी गप्पागोष्टी करण्यात रंगून गेली होती. '' कोणी बाशमाचकीनं नावाने गृहस्थ भेटायला आले आहेत ,'' अशी अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीला हाताखालच्या कारकुनानं वर्दी दिली.

'' कोण आहेत ते? '' असा आतून प्रश्न आला.

'' एक सरकारी नोकर ''

'' अस्सं काय ! त्यांना थांबायला सांग. मी अत्यंत जरुरीच्या कामात आहे! ''

असे अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीनं फर्मावलं.

आपण कामात आहोत, असं चक्क खोटं त्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीनं सांगितलं; हे आपण सर्वजण जाणतोच.

खरं तर तो कुठल्याही महत्त्वाच्या कामात नव्हता. बालपणीच्या मित्राबरोबर बोलायचं ते सारं बोलून झालं होतं. सारे विषय संपून गेले होते. मध्येमध्ये बराच वेळ ते एकमेकांशी बोलतही नव्हते. उगाचच एकमेकांच्या खांद्यावर थापटत '' हं! मग काय इव्हान अब्रामोविच '' किंवा '' हो हो स्टीफन व्हारल्मोविच '' असं वायफळ काही बोलत होते. पण आपण सरकारी नोकरांनासुद्धा कसं रखडायला लावतो, हे आपल्या मित्राला त्याला दाखवायचं होतं. त्याच्या मित्राने आपली सरकारी नोकरी बऱ्याच वर्षांपूर्वी सोडली होती व तो आपल्या गावी स्थायिक झाला होता. बराच वेळ गप्प बसून व खुषीत धूम्रपान करीत घालवल्यावर अचानक साहेबांना आठवण झाली. काही कागदपत्रांवर सह्या घेण्यासाठी त्याचा सचिव त्याच्या खोलीत आला. त्यावेळी साहेबांनी सांगितलं.

'' कोणी सरकारी नोकर मला भेटावयाला बाहेर थांबलाय, त्याला आंत पाठवा ''

अकाकीचा एकंदर अवतार, त्याचे जुने कपडे पाहून साहेबांनी जरा मोठ्या आवाजात कडक शब्दांत विचारलं. '' काय पाहिजे तुम्हाला? '' त्या खास

आवाजात बोलण्याची तालीम साहेबांनी या पदावर येण्यापूर्वी घरी आरशासमोर उभं राहून बऱ्याचदा केली होती.

अकाकी आधीच भित्रा! त्या करड्या आवाजातल्या प्रश्नानं तो भीतीनं थरथरू लागला. सारा धीर एकवटून कसंबसं चाचरतच त्यानं घडलेली हकीगत सांगायला सुरुवात केली की, त्याचा नवा ओव्हरकोट अत्यंत दांडगाईनं चोरांनी लुबाडला. साहेब मजकुरांनी आपलं वजन खर्ची घालून शहराच्या पोलीस उच्च अंमलदाराकडे अथवा तशाच मोठ्या असामीकडे शब्द टाकावा; जेणेकरून आपला कोट आपल्याला परत मिळावा. एवढी विनंती करायला आपण साहेबांकडे जातीनं आलो आहोत. एवढं बोलताना अकाकीनं अनेकदा ' बरं का ' ' समजलं ना ' वगैरे फालतू शब्दांची खैरात केली.

त्या अत्यंत महत्त्वाच्या साहेबांना अकाकीच्या या आगाऊपणाची भयंकर चीड आली, आणि ते गंरजले.

" अहो श्रीमान्! तुम्हाला काय म्हणायचं आहे? तुम्ही माझ्याकडे कशासाठी आलांत? माझ्याकडे कसं यायचं? कुणाच्या मध्यस्थीनं यायचं? याची रीतभात तुम्हाला माहीत नाही? प्रथम तुम्ही माझ्या कचेरीकडे तुमच्या कामासाठी रीतसर अर्ज करायला पाहिजे होता. तुमचा अर्ज प्रथम माझ्या अव्वल कारकुनाकडे द्यायला हवा. तो मग माझ्या सचिवाकडे गेला असता. नंतर योग्य वेळी माझ्या सचिवानं तो माझ्यापुढे ठेवला असता समजलं ......'?

अकाकीनं पुन्हा एकदा सारं धैर्य एकवटून (जे आता त्याच्या जवळ फारच थोडं शिल्लक राहिलं होतं)–त्यातही घामानं चिंब झाला होता.–बोलायचा प्रयत्न केला, " महाराज मी स्वतः जातीनं येऊन आपल्याला त्रास दिला कारण हे मधले लोक कधीकधी विश्वासार्ह नसतात........

" काय? काय म्हणालात तुम्ही महाशय? " असं ते अत्यंत महत्त्वाचे गृहस्थ गरजले. असं बोलण्याचं तुम्हाला धैर्य तरी कसं झालं ? या असल्या विक्षिप्त कल्पना तुमच्या डोक्यात कशा उद्‌भवल्या ? या असल्या बंडखोर कल्पना वरिष्ठांविरुद्ध नव्या पिढीच्या डोक्यात शिरायला लागल्या आहेत.

अकाकीनं पन्नाशी ओलांडली आहे ही गोष्ट अती महत्त्वाच्या व्यक्तीच्या ध्यानात आली नसावी. अर्थात एकाद्या सत्तर वर्षाच्या व्यक्तीपुढे तुलनात्मक दृष्ट्या अकाकीला तरुण म्हटलं पाहिजे.

'' महाशय, आपलं बोलणं पुढे रेटीत साहेब गरजले, '' तुम्ही कुणापुढे बोलत आहात ? तुम्ही कोणासमोर उभे आहात, याची तुम्हाला जाणीव आहे का ? मी काय बोलतो आहे समजतंय का तुम्हाला ? '' हे बोलता बोलता साहेबांनी आपला पाय जोरानं आपटला. त्यांचा आवाज इतका कमालीचा वरच्या पट्टीत गेला, की एकटा अकाकी अकायेविच नाही; तर सर्वच हादरले. अकाकी तर बिचारा भीतीनं चक्कर येऊन खाली पडण्याच्या बेतात होता. उभं राहणंही त्याला अशक्य होतं. मोठा आवाज ऐकून एक दरवान आत आला व त्यानं अकाकीला आधार दिला नाहीतर तो पडलाच असता. त्याला उचलून बाहेर नेण्यात आलं.

अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीला मोठं समाधान वाटलं. आपण एखाद्या व्यक्तीला आपल्या आवाजानं कशी जरब–अगदी त्या व्यक्तीला मूर्च्छा येईपर्यंत वेळ यावी–बसवितो ही गोष्ट कल्पनेबाहेर यशस्वी झाली. साहेबांनी हळूच आपल्या मित्राकडे मोठ्या अभिमानानं पाहिलं. आपला मित्रही बेचैन व अस्वस्थ झालेला होताच. एवढंच नव्हे, तर तोही जरा घाबरलेला दिसला, असं त्यांना खात्रीनं वाटलं.

जिना उतरून आपण रस्त्यावर केव्हा आलो ते बिचाऱ्या अकाकीला समजलं नाही. त्याला काही आठवत नव्हतं. त्याच्या हातापायातली शक्ती पार गेली, ते थंडच पडले होते. अशा तऱ्हेनं कोणत्याही वरिष्ठ व्यक्तीनं त्याच्या खात्याच्या वरिष्ठानं सुद्धा त्याला अशा तऱ्हेनं धारेवर धरलं नव्हतं. बाहेर सुटलेल्या भन्नाट वाऱ्यातून अकाकी शून्य मनानं चालत होता. त्या भयंकर वाऱ्यातून तोंड उघडं ठेऊन ठेचाळत, धापा टाकत अकाकी फूटपायरीवरून चालत होता. वारा सर्व

बाजूनी सुसाट वाहात होता. असा वारा सुटणं हे सेंट पीटर्सबर्ग शहराचं वैशिष्ट्यच आहे. त्या वाऱ्यानं अकाकीचा घसा सुजला, तो कसाबसा घरी येऊन पोचला पण त्याच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता. त्याच्या साऱ्या शरिराला वेदना होत होत्या. एकाद्या बड्या अंमलदाराच्या कडून दिल्या जाणाऱ्या ताकीदीचा एवढा भयानक परीणाम होऊ शकतो. हं!

दुसऱ्या दिवशी अकाकी तापानं फणफणला. अकाकीचा आजार अपेक्षेपेक्षा झपाट्यानं वाढत गेला. तो झपाट्यानं वाढण्यासाठी उदारपणे मदत करणाऱ्या सेंट पीटर्सबर्गच्या हवेला धन्यवाद द्यायचे का? डॉक्टरला बोलावण्यात आलं. त्यानं काही उपाय केले, एवढं दाखवण्यासाठी पोटीस लावायला सागितलं. घरमालकिणीला बाजूला बोलवून सागितलं की " काही उपाय करण्याच्या पलीकडे रोग्याची अवस्था गेली आहे. सार काही संपत आलं आहे. रोगी फार तर एकदोन दिवसांचा सोबती आहे. वेळ घालवण्यात अर्थ नाही, तुम्ही त्याच्यासाठी शवपेटी मागवण्याची व्यवस्था करा! त्याला ओकच्या लाकडाची परवडणार नाही. खरं ना? "

बिचाऱ्या अकाकीनं हे संभाषण ऐकलं असेल कां? समजा, ऐकलं असलं तर त्यामुळे तो पार खचला असता कां? आपल्या दयनीय अवस्थेबद्दल तो झुरत होता का? पण हे सागणं कठीणच आहे. अंगात  असलेल्या भयंकर तापामुळे त्याला वात झाला होता. त्याला सतत भयानक आकृत्या भेडसावत होत्या. त्याला पेट्रोविच दिसायचा आणि त्याला नवीन कोट बनविण्यासाठी तो फर्मावायचा. त्या कोटाला चोरांसाठी खास प्रकारच्या पट्ट्या लावायला सांगत होता. 'ते चोर आपल्या खाटेखाली लपले आहेत, त्यांना बाहेर काढ' असं घरमालकिणीला सांगायचा. एकदा तर ते चोर आपल्या पांघरूणात बसले आहेत, असंही म्हणायचा. आपण नवा कोट बनवून घेतला असताना जुना भिंतीवर कशाला टांगून ठेवलाय? असं बडबडायचा. आपण त्या  अंमलदारापुढे; अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीच्या पुढे उभे असून ते साहेब आपल्याला ताकीद देत आहेत व आपण " साहेब क्षमा करा!" असं

असं बडबडला. नंतर तो फारच वाईट बोलू लागला. मध्येच मोठ्यानं ओरडू लागला. बिचारी घरमालकीण, देवाचा धावा करू लागली. मध्येच ' महाराज ' शब्द उच्चारायचा आणि असंबद्ध बडबडायचा. हे सारं बडबडणं व विचार हे त्या ओव्हरकोटाच्या भोवतीच घुटमळत होते. शेवटी बिचाऱ्या अकाकीनं शेवटचा निश्वास सोडला.

□ □

## प्रकरण सहावे

अकाकीची खोली किंवा त्याच्या वस्तू यावर हक्क सागणारे त्याचे जवळचे किंवा दूरचे कोणी नातेवाईक नव्हते. त्यामुळे त्याची मालमत्ता किंवा खोली मोहोरबंद करण्याचा प्रश्नच नव्हता. त्याची मालमत्ता म्हणजे काय तर एक कांबळं, काही सरकारी कोरे कागद, एकदोन पायमोज्याचे जोड, पाटलोणीची तुटलेली बटणं व तो ऐतिहासिक जुना कोट! तो प्रसिद्ध कोट सर्वांच्या परिचयाचा आहेच. अकाकीला शेवटी मूठमाती कोणी दिली; याबद्दलची माहिती जाणून घेण्यात लेखकाला स्वारस्य नव्हतं.

सेंट पीटर्सबर्ग शहराचे सर्व व्यवहार अकाकीशिवाय सुरळीत चालले होते. जणू अकाकी कधी त्या शहरात राहिलाच नव्हता. एक मनुष्यप्राणी मागे काहीएक न ठेवता निघून गेला. एक व्यक्ती, ज्याची कुणी, कधी काळजी घेतली नाही. तो कधी कुणाचाही आवडता नव्हता. कुणालाही त्याच्यात स्वारस्य नव्हतं. एखादा प्राणीशास्त्रज्ञ एकाद्या किटकाला टाचणीत टोचून मायक्रोस्कोपखाली घालतो पण तेवढीही आस्था अकाकीबद्धल कुणी दाखवली नाही. त्याच्या खात्यातल्या लोकांकडून फक्त दमदाटी व अपमान याशिवाय अकाकीच्या वाट्याला काहीही आलं नाही. शेवटी बिचारा एका विचित्र अपघातात सापडून मृत्युमुखी पडला. मृत्युपूर्वी एकदाच, एक छोटासा क्षण त्या ओव्हरकोटाच्या निमित्तानं त्याच्या आयुष्यात चमकून गेला. त्या नव्या ओव्हरकोटानं, त्याच्या नीरस रटाळ, दरिद्री आयुष्यात काही वेळ उत्साह आणि आनंद आणला होता. शेवटी त्याच ओव्हरकोटानं त्याच्यावर दारुण प्रसंग ओढवला आणि त्याला कायमची चिरनिद्रा घ्यायला पाठवलं, असा हा नियतीचा खेळ! असे जीव घेणारे प्रसंग अनेकांच्या अगदी बड्याबड्यांच्या सुद्धा आयुष्यात येतात.

अकाकीच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत त्याच्या कचेरीकडून वरिष्ठानी एकाला अकाकीची चौकशी करण्यासाठी व सत्वर कामावर हजर होण्याचा निरोप घेऊन पाठवलं. पण तो माणूस आला तसाच परत गेला. " अकाकी येऊ शकत नाही असं त्या निरोप्यानं सांगितलं ", " का येऊ शकत नाही ? " कारण तो या जगात नाही. तो स्वर्गवासी झाला आहे.. चार दिवसांपूर्वी त्याच दफनही झालं." अशा तऱ्हेने अकाकीच्या मृत्यूची बातमी त्याच्या खात्यातल्या लोकांना कळली. दुसऱ्या दिवशी अकाकीच्या जागेवर दुसऱ्या एका तरुण कारकुनाची नेमणूक झाली. परंतु त्याचं अक्षर अकाकीसारखं वळणदार नव्हतं.

अकाकी अकायेविचचा इथेच शेवट झाला नाही; अशी कधी कोणी पुसटशी कल्पना केली होता का? सबंध आयुष्यभर अकाकी सेंट पीटर्सबर्ग शहराच्या जनतेला अनभिज्ञ राहिला असला तरी मृत्यूनंतर  कित्येक दिवस अकाकीबद्दल लोकात चर्चा होती. जणू काही जिवंतपणी जरी दुर्लक्षित राहिलेला असला तरी मृत्यूनंतर सर्वांचं लक्ष्य बनला. असं झालं खरं आणि आमच्या गोष्टीनं अनपेक्षितपणे एक विचित्र; चमत्कृतीपूर्ण वळण घेतलं.

सेंट पीटर्सबर्ग शहराच्या रहिवाशांत अचानक एक सनसनाटी अफवा पसरली. कुण्या एका सरकारी कचेरीतील कारकूनाचं भूत कालीनकीन पूल व त्याच्या आसपास फिरत असतं. हे भूत चोरीला गेलेल्या ओव्हरकोटाचा तपास करत फिरत असतं. त्या रस्त्याने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या लहान-मोठे, श्रीमंत, गरीब, बडे अंमलदार व साधे कारकून या सर्वांचे ओव्हरकोट त्यांच्या अंगावरून ओरबाडत असतं. कसल्याही तऱ्हेचे ओव्हरकोट, साधे, मांजराची किंवा कसलीही फर लावलेले, रुपेरी-सोनेरी पट्ट्या लावलेले, रुंद कॉलर असलेले, किंमती लोकरीचे, अंगाला ऊब देणारे, वगैरे! त्याचा त्यावर सतत हात पडत असे.

अकाकीच्या कचेरीतल्या एका कारकुनानं स्वतःच्या डोळ्यांनी ते भूत पाहिलं व ' अकाकी अकायेविच ' असं लगेच ओळखलं. तो अतिशय घाबरला व पळत सुटला. त्यामुळे त्याला त्या भुताचं नीटस निरीक्षण करता आलं नाही. पण दूर अंतरावरून ते भूत त्याला बोटांनी खुणावत होतं; एवढं त्यानं पाहिलं.

ठिकठिकाणाहून साध्या सरकारी नोकरांच्याच नव्हे, तर मोठे अंमलदार अधिकारी यांच्याकडूनही तक्रारी येत होत्या. भूत कुणाचेही ओव्हरकोट ओरबाडत असे त्यामुळे लोकांचे खांदे व पाठ यांना भयानक थंडीपासून धोका निर्माण झाला होता. त्या भुताला पकडावं, असे पोलिसांना हुकुम सुटले होते. जिवंत किंवा मेलेल्या परिस्थितीत त्याला पकडून कठोर शिक्षा दिली जावी, म्हणजे इतर भुतांना जरब बसेल.

एक बिचारा म्हातारा गवई! एकेकाळी या गवयानं फार मोठं नाव; कीर्ती मिळवली होती. किरयुश्कीन गल्लीतून जात होता. त्या गवयाच्या अंगावरचा कोट ओढून काढत असताना त्या गल्लीत गस्त घालणाऱ्या पोलिसाने प्रत्यक्ष पाहिलं आणि त्या भुताला त्याची कॉलर धरून पकडलं. त्या भुताला पकडल्यावर मदतीसाठी बोलावलं. भुताला त्यांनी घट्ट धरून ठेवावं असं त्यांना सांगितलं, कारण त्याला तपकीर ओंढण्याची तलफ आली होती. त्याची तपकिरीची डबी त्यानं बुटात ठेवली होती ती त्यानं बाहेर काढली. कारण त्याचं नाक थंडीनं गारठलं होतं. त्यानं उजवी नाकपुडी दाबून डाव्या नाकपुडीत तपकिरीची चिमूट कोंबली. ती तपकीर भलतीच कडक असली पाहिजे कारण त्या वासानं भुताला सुद्धा जोराची शिंक आली आणि नाकातील द्रवाचे शिंतोडे त्या बिचाऱ्या पोलिसाच्या चेहऱ्यावर, विशेषतः डोळ्यावर उडाले. आपले डोळे पुसण्यासाठी सहाजिकच त्या पोलिसांनी हात वर केले, तेवढ्यात ते भूत नाहीसं झालं. आपण खरोखर त्या भुताला पकडलं होतं कां? असा त्याच्या मनांत संदेह निर्माण झाला. तेव्हापासून साऱ्या शिपायांनी मृतांची येवढी धास्ती घेतली की, जिवंत माणसांनासुद्धा पकडायचीसुद्धा हिम्मत त्यांना होत नसे. कधीकधी गुन्हा करताना कोणी दिसलंच तर पोलीस बसल्या जागेवरूनच त्याला " अरे काय करतो आहेस तिकडे? चालायला लाग !" असं दरडावत. त्या सरकारी नोकराचं भूत कालीनकीन पुलाच्या पलीकडे वावरू लागलं व सरळमार्गी नागरिकांना जाता येता सतावू लागलं.

अरे! आपण त्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीला विसरलोच होतो की! या साऱ्या गोष्टीला असं भयानक वळण मिळायला तोच तर कारणीभूत झाला होता. अकाकीला अशा तऱ्हेनं फैलावर घेतल्यामुळे तो निघून गेला होता. यानंतर या

महाशयांना हुरहूर वाटूं लागली. तशी त्याला माणुसकीची जाण होती, सहानुभुती पण होती. माणसांची तो कदर करीत असे. पण अनेकदा त्याचा हुद्दा आड येई. अनेक वर्षांनी भेटलेला त्याचा बालमित्र गेल्यावर त्याला अकाकीबद्दल काळजी वाटू लागली. अकाकीचा उतरलेला चेहरा त्याच्या डोक्यातून काही केल्या जाईना! वरिष्ठांनी केलेली कानउघडणी त्या सनदी नोकराला का बर सहन करता आली नाही? त्या महाशयांना इतकी काळजी वाटू लागली की अखेरीस त्यांनी आपल्या खात्यातल्या एका कारकुनाला अकाकी कसा आहे, काय करतो, त्याचा चोरीस गेलेला ओव्हरकोट त्याला परत मिळाला का? याची चौकशी करण्यासाठी पाठवलं. अकाकी ताप येऊन मरण पावला, हे कळल्यावर साहेब फार बेचैन झाले. त्यांचा सारा दिवस वाईट गेला. त्याची सद्सद्विवेक बुद्धी त्याना टोचू लागली. झाल्यागेल्या गोष्टींचा विसर पडावा व मन दुसरीकडे गुंतवावं या उद्देशानं तो मित्राबरोबर सहलीला गेला. तिथे त्याला खूपच लोक भेटले. ते सारे जवळपास त्याच्याच्च श्रेणीतले होते. त्याचा वेळ फार मजेत, चांगला गेला. जेवताना साहेबांनी शॅम्पेन जरा जास्तच घेतली. त्यामुळे त्यांची वृत्ती उल्हासित झाली होती. सरळ घरी परतण्याऐवजी त्यांनी आपल्या जुन्या प्रिय मैत्रिणीकडे जायचं ठरवलं. या मैत्रीणीचं नाव होतं कॅरोलिना इव्हानोव्हा. ही दिसायला फारशी सुंदर किंवा तरुणही नव्हती. साहेब मजकुरांची पत्नी दिसण्यात आकर्षक व तुलनेनं तरूण होती. शिवाय साहेबांना दोन मुलगे होते, पैकी एक सरकारी नोकरीतही होता. साहेबांना एक सोळा वर्षांची गोड मुलगीही होती. ती रोज लाडिकपणे हाका मारून सकाळी वडिलांना उठवत असे. तेव्हा साहेबांच कुटुंब तसं प्रेमळ व समाधानी होतं. पण तरीही शहरच्या दुसऱ्या भागात त्यांना ही मैत्रीण होती. अगदी निव्वळ मैत्रीण! असो! जगात असं काही असतं याबद्दल आपण कशाला उठाठेव करा?

सहलीहून परतताना त्यांनी कॅरोलीनाकडे जायचं ठरवलं व गाडीवानाला तसा हुकूम दिला. त्यांनी आपला गरम ओव्हरकोट अंगाभोवती घट्ट लपेटून घेतला. त्यांच्या मनांत अनेक सुखदायक विचार अगदी एकापाठोपाठ येत होते. त्या दिवशी सहलीत अनुभवलेले सुखद क्षण, तिथल्या झालेल्या गप्पा, विनोद, कोट्या याच्या आठवणीत साहेब अगदी मश्गुल झाले होते. मधूनच स्वतःशीच आनंदानं तोंडानं

मजेदार आवाज काढत होते. पण हा नतद्रष्ट वारा अत्यंत वेगानं वाहत जाऊन त्यांच्या तोंडावर चक्क ओरबाडल्यासारखं करत होता आणि साहेब बचाव करत होते. इतक्यात एकाएकी आपल्या कोटाची कॉलर कुणातरी खेचली आहे असं त्यांना वाटलं. मान वळवून पहाता एक किरकोळ शरीरयष्टी असलेली सरकारी नोकराचा जुनाट गणवेष घातलेली मानवी आकृती दिसली. तो अकाकी अकायेविच आहे हे त्यांनी त्या भेदरलेल्या स्थितीतही ओळखलं. त्या आकृतीचा चेहरा भकास व बर्फाप्रमाणे सफेद-मृताचा चेहरा होता. त्याचं तोंड उघडं असून त्यानं ते वेडंवाकडं करून भयानक दुर्गंधी सोडली. त्यामुळे त्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तिमत्वाची भीतीनं गाळण उडाली. अकाकीच्या त्या भुतानं पुढील शब्द उच्चारले '' बरा सापडलास! आता तुला सोडत नाही. तुझा ओव्हरकोट मी घेणार. माझा ओव्हरकोट चोरीला गेला तेव्हा तुला पर्वा वाटली नाही. शिवाय शोधून काढायला मदतही केली नाहीस. उलट मला दमदाटी केलीस, वाटेल तसा अपमान केलास. आता हा तुझा कोट मुकाट्यानं मला दे! 'हे गरीब बिच्चारे, अत्यंत महत्त्वाचे साहेब भीतीनं अर्धमेले झाले. कचेरीत ताठपणानं वावरणारे व आपल्यापेक्षा कमी श्रेणीतल्या लोकांना तुच्छ समजणारे! त्यांच्या व्यक्तिमत्वाला पाहून लोकांना हा एक धटिंगण उभा आहे असा भास होत असे! पण यावेळी भुताच्या धास्तीनं आपली हृदयक्रिया बंद पडेल की काय असं त्यांना वाटलं. त्यांनी आपला ओव्हरकोट आपल्या हातांनी काढून रस्त्यावर फेकला व गाडीवानाला गाडी घराकडे वळवायला सांगितलं. गंभीर परिस्थितीत, ओढल्या आवाजात हुकूम आला आहे हे लक्षण वरं नाही, हे गाडीवानानं ओळखलं. आपलं डोकं खाली वाकवून त्यानं घोड्यावर चाबूक फटकवला. पाचसहा मिनिटांत हे अत्यंत महत्त्वाचे साहेब आपल्या घराच्या दारांत येऊन थडकले.

कॅरोलीना इव्हानोव्हाकडे जाण्याऐवजी साहेब ओव्हरकोटाशिवाय अत्यंत घाबरलेल्या मनःस्थितीत आपल्या खोलीत लडखडत येऊन पोचले. रात्रभर त्यांना झोप आली नाही. सकाळी न्याहरीच्या वेळी त्यांच्या मुलीनं त्याच्याकडे पाहून सरळ सवाल केला. '' पापा तुम्हाला काही होतंय कां? '' पण पापानी उत्तर दिलं नाही.

आपल्याला काय होतेय याबद्दल त्यांनी कुणाकडेही उच्चार केला नाही. आपल्याला कुठे जायचं होतं व आपण कुठे गेलो होतो याबद्दल त्यांनी मौनच स्वीकारलं.

या प्रसंगाचा त्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीवर फार खोलपणे परिणाम झाला. '' तुमची हिम्मत कशी झाली ? तुम्ही कुणासमोर उभं राहून बोलत आहात, याची शुद्ध आहे कां?'' वगैरे त्यांची आवडती सराईत भाषा त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्यांना क्वचित् ऐकायला येते. साहेब समोरच्या व्यक्तीचं म्हणणं शांतपणे ऐकून घेऊन मगच जरूर तर ती भाषा वापरतात.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या सरकारी नोकराचं भूत त्या दिवसानंतर कोणालाही दिसलं नाही. त्या भुताला मिळालेला साहेबांचा कोट त्याला अगदी बरोबर फिट्ट बसल्यामुळे ते खूष झालं असेल असा निष्कर्ष काढायला हरकत नाही. कुणाचे ओव्हरकोट ओरबाडल्याचं तरी बरेच दिवसांत ऐकलं नव्हतं. काही उद्योगधंदा नसणारे व उगाच अफवा पसरवणारे लोक कधीकधी ते भूत दिसतं अशा गप्पा मारत. पण कोलोम्ना भागाच्या पोलिसाला म्हणे ते दिसलं होतं, एका घराच्यामागून ते आलं होतं, तेवढ्यानं तो अस्ताव्यस्त झाला होता. एकदा एक लहान डुक्कर कुठून तरी धावत आला. पोलीस त्याच्यामागे धावला. तिथं उभ्या असलेल्या तीन तरुण पोरांनी ते पाहिलं व ते मोठ्यानं हसले. पोलिसाला राग आला व त्यानं त्या पोरांना दहादहा पैसे दंड केला. आपल्या तपकिरीसाठी तो पोलीस भुताला थांबवू शकला नाही. त्याच्या पाठोपाठ गेला. भुतानं मागे वळून '' काय पाहिजे ?'' असं दरडावले व आपली मूठ त्याच्या रोखानं धरली. ती मूठ विचित्र होती. जिवंत माणसाची वाटत नव्हती. '' काही नाही '' अस बोलून पोलीस मागे वळला. हे भूत खूपच उंच असून त्याला झुपकेदार मिशा होत्या. ते चालत ओबूकोव्ह पुलाच्या दिशेन गेलं व रात्रीच्या अंधारात नाहीसं झालं.

□ □